
माणुसकी
श्रीपाद राऊतवाड
ई-साहित्य प्रतिष्ठाण प्रकाशीत 'माणुसकी'.
ई साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com
esahity@gmail.com

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# माणुसकी

## (वैचारीक लेख संग्रह)

**लेखक**

**श्रीपाद नागनाथ राऊतवाड**

**माणुसकी (वैचारिक)**

**श्रीपाद नागनाथ राऊतवाड**

पत्ता :- मदनूर जि. कामारेड्डी (तेलंगणा राज्य)

मो. ९९७००५२८३७/८००७८७००२६

ब्लॉग :- htt://shripadrautwad. blogspot. com

या पुस्तकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकांकडे सुरक्षित असून, पुस्तकांचे किव्हा त्यातील अंश्याचे पुनर्मुद्रण व नाट्य चित्रपट किव्हा इतर स्वरूपात करण्यासाठी लेखकांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे नकेल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

his declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

## ●लेखकाचा अल्प परिचय



नाव :- श्रीपाद नागनाथ राऊतवाड

पत्ता :- घर नंबर. १०-१०२ रथ गल्ली

, मदनूर जि. कामारेड्डी (तेलंगणा राज्य)

पिन कोड :- ५०३३०९

व्यवसाय :- स्थापत्य अभियांत्रिकी विद्यार्थी

जन्म तारीख :- ०९ नव्हेंबर १९९३

संपर्क क्रमांक :- ९९७००५२८३७, ८००७८७००२६

मेल :- Srautwad@gmail. com

ब्लॉग :- htt://shripadrautwad. blogspot. com

■ प्रकाशित साहित्य :-

● स्त्री (वैचारिक) ई-बुक

● अत्ता पर्यंत जवजवळ 350 च्या वर वृत्तपत्रात लेख प्रकाशित झाले आहेत.

■ सामजिक कार्य :-

● महाराष्ट्र, तेलंगणा या भागात फुले शाहू आंबेडकर यांच्या वैचारिक धारेवर व्यख्यानाच्या माध्यमातून समाज प्रबोधनाचे कार्य.

● समाजातील वृद्ध, अपंग, शेतकरी, स्त्री अत्याच्यार या सारख्या अनेक समस्येवर प्रकाश टाकणारे वैचारिक लेखन.

■ पुरस्कार / सन्मान

● भारतीय बहुजन साहित्य अकादमी मुंबई यांच्या कडून "साहित्य सेवारत्न -२०१७" पुरस्कार.

● भावना बहुउदेशीय संस्था नाशिक यांच्या वतीने, "राष्ट्रीय सेवारत्न पुरस्कार-२०१७".

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/stree_shripad_rautwad. pdf






# प्रस्तावना

भाषा ही व्यक्त करण्याचे एक साधन आहे. घरात जी भाषा बोलली जाते, तीच भाषा मुले सहज अवगत करू शकतात. म्हणूनच म्हटले जाते की, मुलांना त्यांच्या मातृभाषेतून शिक्षण द्या. त्यातच एखादा तेलंगणात म्हणजे तेलगू भाषिक प्रदेशात राहत असेल आणि मराठीमध्ये व्यवहार करत असेल तर अश्याचे कौतुक करणे उचित ठरेल. असाच एक उदयोन्मुख लेखक आहे की जो तेलंगणाच्या मदनुर या गावाचा आहे.

महाराष्ट्राच्या सीमेवर वसलेले हे गाव. घरात सर्वच जण तेलगू बोलतात मात्र लेखकांनी सीमेवर असलेल्या महाराष्ट्रातील मराठी भाषाकडे आकर्षित झाले ते मराठी भाषेची पगडी घट्ट आवळूनच. सुरवातीला छानपैकी लिहू आणि वाचू लागले. घरात लेखनाची परंपरा नाही तरी त्यांना लेखनाची शैली प्राप्त झाली ती ईश्वराची देणंच म्हणावे लागेल.

मागील काही दिवसांपासून सातत्याने वृत्तपत्रात विविध सामाजिक समस्यावर आपली पहार चालवली. त्यांनी यापूर्वी स्त्री नावाचे एक वैचारिक पुस्तक लिहिले ज्याचे स्वागत सर्व महाराष्ट्रापाठोपाठ तेलंगणातही झाले.

आगामी येत असलेल्या माणुसकी या पुस्तकात देखील एका पेक्षा एक सरस अश्या वैचारिक बाबीवर प्रकाश टाकणारे लेख त्यांनी रेखाटले आहेत. त्यांच्या सामाजिक जीवनात कुटुंबाचे संस्कार खूप मोलाचे आहे हे लेख वाचतांना प्रकर्षाने जाणवतात. शेजारी पाजारी, गावात, गल्लीत ज्या बाबी घडतात आणि लेखक जे पाहतो ते सर्व शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्या लेखनात तळमळ आणि समाज सुधारणा व्हावी यासाठी प्रचंड घालमेल दिसून येते. कुटुंबात अनेक चढ उतार येतात त्या सर्व बाबीचा उहापोह या पुस्तकात करण्याचा लेखकांचा प्रयत्न स्तुत्य आहे. माणुसकी आजघडीला का लोपपावत चालली या एकाच विषयाच्या भोवती सारेच लेख रेंगाळत असतात.

माणसाने निसर्गावर केलेलं प्रेम, प्राण्यामात्रावर केलेलं प्रेम, समाजावर केलेले प्रेम त्यातून निर्माण होणार प्रेम, आपुलकी, संवेदना, परोपकार या सर्व बाबींना एकवटून निर्माण होणारा माणुसकी,

मानवता, समाजाबद्दल असलेलं आपुलकी हे कुठेतरी लोपापवत चालली असं लेखकांच्या लेखणीच्या दूरदृष्टीतून स्पष्टपणे दिसून येत आहे, यातील लेख वाचल्यावर वाचक एक मिनीट नक्की विचार करेल यात शंकाच नाही. श्रीपाद राऊतवाड यांच्या माणुसकी या पुस्तकाचे वाचक स्वागत करतील अशी सदिच्छा या निमित्ताने व्यक्त करतो.

शेवटी मला प्रत्येकाना एकच सांगावेसे वाटते, हीच आमची प्रार्थना अन हेच आमचे मागणे माणसाने माणसाशी माणसासम वागणे.

**नासा येवतीकर, स्तंभलेखक**

**9423625769**

या पुस्तकात लेखकाने व्यक्त केलेले विचार व मते ही त्या लेखकाची असून प्रकाशक त्यांच्याशी सहमत असतीलच असे नाही.

लेखक तेलंगण राज्यातील तेलुगू भाषिक असूनही मराठीतून व्यक्त होतात त्याबद्दल आम्ही त्यांचे कौतुक करतो. तेलंगणातील हिंदी व मराठी यांचा एक वेगळा बाज आहे. त्यामुळे त्या भाषेचा तो बाज तसाच ठेवला आहे. कृपया त्यांना पश्चिम महाराष्ट्रातील मराठीच्या तुलनेने पाहू नये ही विनंती.

टीम ई साहित्य

# ●मनोगत

स्त्री या माझ्या वैचारिक पुस्तकाच्या यशस्वीतेनंतर माझं "माणुसकी" नावाचं पुस्तक आपल्या हाती देतांना मनस्वी आनंद होतो आहे. अनेक वाचकांनी 'स्त्री' या पुस्तकाबद्दल आपापली मते व्यक्त केली. त्या सर्वांचे आभार. आणि ई-साहित्य प्रतिष्ठानचे धन्यवाद, व लेखक नागोराव येवतीकर सरांनी माझ्या माणुसकी या पुस्तकासाठी प्रस्तावना लिहून माझ्या पुस्तकाची शोभा वाढवली, त्या बद्दल त्याचं आभार.

बऱ्याच दिवसापासून स्वतःचं पुस्तक असावं या स्वप्नात वावरतांना स्त्री सारख्या वैचारिक पुस्तकं १५ ऑगस्ट २०१८ रोजी प्रकाशनाची प्रसंग आला आणि ई-साहित्य च्या व्यासपीठावर माझं पुस्तक प्रकाशन झाला. विविध स्थरावरून त्या पुस्तकास प्रतिक्रिया मिळाल्या, पुण्याहून शिवणी ताई धावडे यांनी समीक्षा लिहून माझ्या पुस्तकाचे समाजात एक वेगळाच स्थान मिळवून दिला, त्या बद्दल त्यांचंही मनःपूर्वक आभार. तुम्हा सर्वाचं प्रेम, प्रतिसाद व प्रतिक्रिये मुळे मला पुन्हा लिहिण्याच मोह आवरला नाही आणि त्यातच हा माणुसकी सारख्या वैचारिक पुस्तकाची निर्मिती झाली.

माणुसकी या शिर्षकाप्रमाणेच पुस्तकाच सारांशही तसाच आहे. यात आपल्याला माणुसकीच्या विविध पैलूंना स्पर्शून रेखाटलेले शद्ब वाचायला मिळणार आहेत. 'खरा तो एकचि धर्म, जगाला प्रेम अर्पावे', या साने गुरुजींच्या ओळी आजही संगणकीय दुनियेत आपल्याला पठवुन सांगावे लागत आहेत. या धावत्या युगात या मानवाला स्वतःच माणूसपण विसरत चाललोत याची भान देखील राहिली नाही. सामाजिक जीवनात अनेक संकट निर्माण होत असतात, अनेक वेदना, दुःख हे सर्वांच्याच वाटेला आलेला घटक आहे. तूर्तास हा मानवी जीवनाचा एक समीकरणच आहे. या दुःखाच्या समीकरणात आपल्या जीवन प्रवासाची आकडे भरल्या शिवाय मानवी जीवनाचे बेरीजच सार्थ होणार नाही. महात्मा गौतम बुद्धांनी या दुःखाच्या कसोटीवर आपल्या धम्माची स्थापना केली, दुःखी जीवनाला धम्माचा मार्ग दिला. अहिंसा व शांतीचा संदेश देत दुःखी मानवांना सुखी जीवनाच्या प्रवासाची वाट दाखवली. अगदी तसेच पुढे अनेक साधुसंत महापुरुष होऊन गेले, त्यांनीही आपापल्या परीने मानवता धर्माचा

प्रचार, प्रसार केला. माणुसकीचे धडे दिले. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत कबीर, संत तुकाराम महाराज, संत गाडगेबाबा, संत तुकडोजी महाराज इ. साधुसंतानी मानवता हाच खरा धर्म, आणि स्त्री आणि पुरुष या दोनच जाती असल्याचे अभंगातून, कीर्तनातून स्पष्टीकरण दिले. मात्र कालांतराने ही शिकवण आजही लोपपावली, इथे धर्माच्या भिंती उभारल्या, जाती-जातीच्या मोठे दरी निर्माण झाल्या, आणि आपापसांत धार्मिक तेढ निर्माण होऊ लागल्या. धर्मातधर्मात रंगाची वाटणी झाली. जाति-जातीत महापुरुषांची वाटणी झाली. माणुसकीचा, मानवतेचा धर्म सांगणाऱ्या साधुसंत महापुरुष हे अत्ता धर्माच्या भिंतीवर उभारले. यांच्या विचारांची जागर कमकुवत चालली. म्हणून या मानवी प्राण्याला याचा रोग ग्रासले आहे, त्या रोगाला प्रबोधनाच्या औषधीचे गरज भासत आहे. आणि ते प्रबोधन या संधुसंताच्या, महापुरुषांच्या विचारातून मिळते. त्यांच्या विचारातून जगण्याचे सामर्थ्य मिळते. आयुष्यात येणाऱ्या संकटांना प्रतिउत्तर मिळते. हीच शिकवण आणि याच संस्काराची कमतरता भासत असल्याने मानव हा मानवतेचा धर्म विसरत चालला आहे..

सामाजिक जीवनात हा मानव आईवडील सारख्या आपल्या मुख्य घटकांना देखील आज वृद्धाश्रमात सोडू लागला आहे, नातलग, गणगोत, आपुलकी, प्रेम, भावना, परोपकार, हे माणुसकीच्या घटकांना ठोकर देत हा मानव प्राणी आज या समाजात जीवन जगत आहे. त्यातच मानवांच्या निर्मितीचा गूढ असलेल्या निसर्गापासूनही हा मानव दूर झाला आहे. निसर्गाची कत्तल करू लागला. डिसीटल च्या दुनीयेत स्वतः डिजीटल झालाच, मात्र समाजालाही डिजीटल करत सुटला आहे. अश्या असंख्य मानवतेच्या पैलूंना माझ्या लेखणीतून स्पर्शून गेललेला हा 'माणुसकी' आपल्या हाती सोपवत आहे. मला सार्थ विश्वास आहे हा पुस्तक आपल्याला नक्कीच आवडेल. माझं हे दुसरं पुस्तक असून, ईसाहित्यच्या माध्यमातून मी तुमच्या पर्यंत पोहचवत आहे. यात काही चुका आढळल्यास सबळ मनाने निदर्शनास आणून द्यावे, जेणेकरून ती चूक पुन्हा माझ्या भविष्यात कधी घडू नये.

**- श्रीपाद नागनाथ राऊतवाड**

★★★★★★★★★★★★★★★★

# अर्पण पत्रिका

## माझ्यात लेखन कला निर्माण करण्यासाठी

## प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष पणे प्रोत्साहित करणाऱ्या

## माझ्या आई-वडीलासह

## सर्वांना अर्पण.......



**( वडील - नागनाथ राऊतवाड, आई - रेणुका राऊतवाड )**

★★★★★★★★★★★★★★★★

# अनुक्रम


- माणुसकी
- लोपपावत चाललेली माणुसकी
- सामाजिक जीवनातील कुटुंब
- शेजार धर्म
- समाजकारण का राजकारण
- मानवता हाच खरा धर्म
- सामाजिक व व्यवहारिक जिवनातील प्रेम
- निसर्ग म्हणजे मानवी जीवनाचे अस्तित्व
- पर्यावरण आणि मानव
- मातृ-पितृ भव
- कुठूंबापासून दुरवलेल्या वृद्धांची दिवाळी
- आधुनिक दुनियेतील मावळता पत्रव्यवहार
- स्मार्टफोन जिंदगी है मेरी
- मानवी जीवनाचे अनमोल विचार
- पाऊलवाट शेवटी एकट्याचीच

## • माणुसकी

प्रेम, दया, वात्सल्य, परोपकार, अहिंसा, रडणे, हंसणे, माणूसकी हे सर्व गुण मानवांचे अलंकार आहेत. दैनंदिनी जिवन जगत असतांना या सर्व सामान्य माणसाच्या जिवनात असे काही शब्द आहेत की जे बोलताना त्याची घणता, त्याची खोल गेलेला अर्थ पटकण लक्षात येत नाही पण ते शब्द असे काही कटू अनुभव शिकवून जातात की काहीचा अर्थ जेवढा लावू तेवढा लागतो, जेवढा ताणू तेवढा ताणतो, जेवढा मणावर घेवू तेवढा घेता येतो. आणि एकदा का त्या शब्दांनी किंवा त्या शब्दाच्या अर्थाने आपल्या मणाचा ताबा घेतला ना की मग आपण त्या शब्दाप्रमाणे किंवा त्या शब्दांच्या अर्थाप्रमाणे समोरच्या व्यक्तींसोबत वावरतो. प्रत्येक गोष्ट प्रत्येक व्यक्ती मध्ये आसते, कधि ते लगेच पहायला मिळते वा कधितरी शोधावी लागते कधि समोरच्या व्यकीच्या वागण्यातून किंवा त्यांच्या बोलण्यातून त्याची ओळख होत असते.

प्रत्येक शब्द कितीही छोटा वा मोठा असो त्या शब्दाच्या गर्भितार्थावरूण त्या शब्दाची जाडी -रूंदी आणि त्याची विस्तृतता कळते. त्यापैकी असाच एक जो आUपल्या सर्वांना परिचित असलेला पण त्याची फारशी खोल  ओळख नसणारा शब्द म्हणजे "माणूसकी" ओळख नसणारा शब्द यासाठी की आजचा माणूस माणसाची ओळख विसरत चालला आहे, "माणूसकी" हा केवळ शब्दच नव्हे तर पर्यायाने आपल्या रोजच्या जगण्यातुन खुद्द माणूसकीच गहाळ होत चालली आहे. असे चित्र समोर दिसत आहे. ऐकायला आणि बोलायला आगदि सहज आणि सोपा वाटणारा शब्द, पण त्याचा नेमका अर्थ काय...

माणूसकी म्हणजे प्रेम, माणूसकी म्हणजे जाणीव, माणूसकी म्हणजे माणसाची माणसाने केलेली कदर, समोरच्या व्यकीचा केलेला आदर, माणूसकी म्हणजे निस्वार्थपणे माणसातील माणूस ओळखुन पुढे केलेला मदतीचा हात. खरच पहायला मिळते का या सद्याच्या धावपळीच्या युगात ही माणूसकी. माणूस आज हे सर्व गुण विसरून "पशुच "जिवण जगत आहे. तो दुसर्याच्या दुःखात रडत नाही व सुखात हसतही नाही. त्याच्या संवेदनां, भावणा कुठेतरी लुप्त झाल्या आहेत. त्यामुळे तो व्यक्त करू शकत नाही.

उदा: रस्त्यावर एखादा अपघात झाला की जखमी माणसाला आधार द्यायला कूणीच पुढे येत नाही. पण बघण्याची भुमीका करणारे बरेच आसतात. दवाखान्यात नेणारा एखादाच भेटेल तेंव्हाच आपल्याला थोडी "माणूसकी" शिल्लक आसल्याची जाणीव होते. पण असा शंभरात एखादाच.

माणसाच्या गर्दित माणूसकी ला शोधावे लागत आहे, आजच्या या माणसातला माणूसकी पणा कुठे लुप्त झाला, कुठे नाहीसा झाला याचा बेतच लागत नाही. ज्या माऊलींने आपल्याला नऊ महिने गर्भात ठेवून, नकोत्या संकटाना समोर जाऊन जन्म दिला, आणि आज त्याच माऊलीला वृद्धाश्रमात पाठवत आहेत. आता तुम्हीच सांगा ही माणूसकी चे लक्षणे आहेत का. ? स्वतःच्या आई-वडिलांना पोसण्याची ज्या व्यक्ती कडे बळ नसतो मग तो माणूस म्हणून जन्माला येवूनतरी कश्याला. ? असे आनेक उदाहरण आहेत माणसाने सोडलेल्या माणूसकीचे.

माणसाला माणूस म्हणून जगण्याचा आधिकार आहे, परंतू "माणूसकी"ला घेवून जगतांना दिसतो का. ? सद्याच्या दैनंदिन जिवनात स्वार्थीपणा हे मानवांच अलंकारच दर्शवते. स्वतःच्या विचारात मग्न आसलेला माणव स्वार्थीसाठी समाजाला लाथाडत चालला आहे. कधितरी समाजाचा विचार हा मानव करतो का. ? असा प्रश्न मला पडत आसतो. समाजात अवैचारीक दृष्टीने सामान्यांना लूटण्याच काम जोमात चलतोय, राजकारणं हा त्यातलाच उदाहरण आहे. समाजसेवा म्हणून सर्वप्रथम माणूसकीचे

गुणधर्म दर्शवतात. जणतेचे मण आपल्याकडे आकर्षित करून घेतात. नंतर त्याच माणूसकच्या गुणधर्मांना लाथाडून जणतेला ठोकर देतात. मग याला माणूसकी म्हणावे का. ?

भर दिवसा उभ्या रस्त्यावर एखाद्या स्त्रीची अभ्रू लूटनारे गूंडे भरपूर दिसतात, पण त्या स्त्री ला त्यांच्यापासून वाचवणारा मात्र कोणीही नसतो. एखादा असला तरी त्याला साथ देणारे कोणीही नसतो. मात्र उघड्या डोळ्याने पाहत असणारे मात्र खुप पहायला मिळतात. बहूतांश लोकांना 'माणूसकी' ची व्याख्या पण त्यांच्या विरोधात वाटते. एखाद्याच्या संकटाप्रसंगी धाव घेण्याऐवजी त्याला संकटात ढकलण्याच काम मात्र सलगरीत्या करता येतो. प्रत्येकाच विचार करण्याची जनतेकडे पाहण्याची दृष्टीकोन आगळा-वेगळाच आसतो. कधीतरी देशासाठी काहीतरी करूया. " अशी भावना आमच्या मनात निर्माण झाल्यावर, समोरच्या व्यक्तींची भावना समजावून घेतांना माणसातली माणूसकी कायमची नष्ट झाली असे म्हणायला हरकत नाही. त्यांची भावना अशी असते, " देशासाठी काहीतरी करू पण, त्यात मला काय मिळणार". म्हणजे आम्ही जगतो फक्त मला काय मिळणार यासाठी, म्हणजेच माणवाने आपल्यातली माणूसकीला कायमरित्या विसरून गेला आहे, त्याला कुठल्याच प्रकारच्या भावणा, प्रेम, दया, संवेदना याची जाणिव होत नाही. हे सर्व गुण त्यातून लूप्त झाले आहेत.

या माणूसकीला जर ओळखायच आसेल तर असे प्रसंग प्रत्येकाच्या जिवणात आले असतील आणी जरी अध्याप आले नसतील तरी कधि ना कधी ते नक्किच येतील. जिवनात आलेल्या त्या प्रसंगाना आगदी एकांतात बसून बारकाइने त्यावर नजर टाका म्हणजे " माणूसकीतला माणूस किंवा माणसातली माणूसकी " शिल्लक राहीली आहे का हे कळेल. या जगात कोणीही तुमचा मित्र किंवा शत्रु म्हणून जन्माला येत नाही. आपली वागणूक, आपला दृष्टीकोण, आपली नाती आणि त्या पेक्षा त्या नात्यांमधिल प्रेम यावर ठरते कोण आपला मित्र, कोण आपला शत्रु ते. मनुष्याचे मोठेपण हे त्यांच्या वयावर नाही तर त्यांच्या विचार आणि कर्तुत्वावर अवलंबून असते. तुमच्या विचारातून तुमच व्यक्तीमत्व झळकत असत. तुमचे विचार समजले की, तुम्ही समजलात म्हणून सुंदर विचार आणि सुंदर व्यक्तिमत्व घडवा.

सदैव समाजातील भावनांना आपलं मानायला शिका, कधीतरी इतरांच्या सुखदुःखात सामील व्हायला शिका, मग बघा आयुष्य किती सुंदर असत ते समजते, कोणी कोणाचं नसत अस म्हणून स्वतःच्या पायाने स्वतःचा रस्ता कपायचा असतो खरे, पण त्या जड होत चाललेल्या पायांना आसरा मिळाले तर बरे ना. म्हातारपनी दोन गोड गोष्टी बोलायला मित्र लागतोच ना, एकांतात किती दिवस काठायचे, जे तारुण्यात श्यक्य झालं ते वृद्धपणी अजिबात नाही होणार. म्हणून तारुण्यातील सामाजिक बांधीलकी शाबूत ठेवून, इतरांच्या मदतीला धाव घेतल्यास. एक्या वेळप्रसंगी कोणी नकार देईल का.. ? आणि हो वेळ ही प्रत्येकाला चांगले व वाईट या दोन्ही प्रसंगाचे दर्शन देते. कदापि आपली वेळ अत्ता चांगली असेलही, मात्र संकटाचे दिवस प्रत्येकाच्या वाटेल येतात हे विसरून चालणार नाही. म्हणून सुंदर जीवन जागा, आणि इतरांनाही सुंदर जीवनाची वाट दाखवा.

# लोप पावत चाललेली माणुसकी.....

माणसाच्या वाढत्या गर्दीत माणुसकी शोधत फिरतोय मी, रस्त्यावरील भीक मागणाऱ्या माणसात देव शोधत फिरतोय मी, कधी त्यांच्या वेदना तरकधी त्याच्या संवेदनाशी जीवनाचं कडीमोल व्याख्या विचारतोय. आयुष्य सुंदर म्हणत भरकटणारे कोण आणि सुंदर आयुष्य स्वतःच्या कर्तृत्वावर व स्वतःच्या मनगटी मिळवणारे कोण. ? सांगाल का. ?

मानवी जीवन जगतोय म्हणजे समाजात आम्ही कोणत्या अंगांचे शृंगार करतोय, मानवी जीवन म्हणजे केवळ आणि केवळ मी आणि माझं पण यातच गुरफटून बसलेला हा समाज कधी आजूबाजूला चालू असलेल्या या निर्घृणपन समजून त्यांवर आपली माणुसकीच्या भिंती बांधत फिरणे हा कर्तव्य समजा व मानवी जीवणाचा उद्धार पणा ही प्रत्येकाच्या हृदयात जागे व्हावे ही काळाची गरज आहे. माणुसकी म्हणजे माणसांनी माणसांशी वागण्याचे कौशल्य नव्हे तर माणसांनी माणसांशी आपुलकीतून आपलंसं मानणारा वर्ग म्हणजे माणुसकीचा रखाना. या मातीशी नाळ असणारा जागृत वर्ग म्हणजे माणुसकी. या मानवी जीवनातील प्रत्येक सजीव सृष्टीसोबत रक्ताचे नाते निर्माण करणारा म्हणजे माणुसकी. या मानवी जीवनात जीवन जगत असतांना अनेकदा डोळयासमोर ठळकपणे दिसुन येते या शेतकाऱ्यांवरील अन्याय असो व माझ्या स्त्रीवर्गावरील अत्याचार किव्हा दलितांवरील अन्याय हे सहज हळव्या मनाला स्पर्शून सांगून जातात, बेटा या जगात माणुसकी लोपपावली आहे, अत्ता त्या शब्दाचा केवळ उदोउदो करण्या पलीकडे आपल्याकडे दुसरं काही उरलं नाही.

सजीवांपैकी सगळयात बुद्धिवान प्राणी म्हणून या मानवी जीवनाला संबोधतात, काही अपवादात्मक गोष्टी वगळता मात्र त्या इतर सजीवांमध्ये असलेली माणुसकीचा एकही अंक या मानवी पैलूंत दिसत नाही. या समाजात वावरताना अनेकदा हे दृश्य आपल्याला पाहायला मिळतात, रस्त्यांवरील जाणाऱ्या महिलांकडे बीभत्स नजरेने पाहणारे हा पुरुष वर्ग असो व अनाथांना, मंदिराबाहेरील भीक मागून जगणाऱ्या भिकाऱ्यांना आपल्या तोंडून निघणारे उद्गार सांगून जातात की आपल्याला संस्कारातून मिळणार माणुसकी नावाचा घटक आपल्या हृदयापासून खूप खूप लांबवर आहे. जेव्हा नऊ महिने नऊ

दिवस आपल्या पोटात आपली काळजी घेणारी ती माता, आपल्याला जन्माला घालतांना असंख्य वेदनेशी सामोरी जाऊन कधी स्वतःचा प्राण गमवूनही बाळाला हे जगदर्शन घडवनारी ती थोर माऊली, आज वृद्धाश्रमात खितपत पडलेली पाहून कुठंतरी मनाला कावळयांनी दंक मारावा या सारखे वेदना होतात. ज्यांनी आपल्या हाताचे बोट पकडून या जमिनीवर चालण्यास शिकवले, स्वतःच्या पायांवर उभा राहण्यास शिकवले. परिस्थिती नसतांनाही पोटाला चिमटा घेऊन दिनरात्र मेहनत करून आज दहा आकडी पगार मिळावयास जे कारणीभूत असलेलं आईवडील. चार चाकी गाडी आणि चार आकडी पगार मिळताच स्वतःच्या घरचा द्वार त्या दैवतांसाठी बंद होतात, ही मोठी खेदेची बाब आहे. समाजातील या कारणांनी वृद्धाश्रमांची वाढती संख्या चिंताजनक आहे. भावंड ही आईवडीलांच्या संगोपनासाठी एकमेकांत वैर निर्माण करून घेतात, रक्ताच्या नात्यात जर ही आपली मानसिकता असेल तर माणुसकीचा गुणधर्म यामध्ये शोधूनही सापडत नाही.

मानवी जीवनातील माणुसकीचा घटक हा वरचेवर कमकुवत चालली आहे. पूर्वी आई वडिलांची सेवा हीच ईश्वर सेवा मानणारा वर्ग अत्ता लोपपावली आहे. रेस्टॉरंट बार मध्ये जेवढा उलाढाल करतांना हा समाज दिसतो, तेवढाच जर खर्च आई वडिलांच्या वृद्धपकाळात लावला तर त्या पेक्षा आनंद या जगात कुठेच मिळत नाही. ना त्या मंदिरातल्या गाभाऱ्यात ना त्या बुवा बापूंच्या गंडयादोऱ्यात. आई वडिलांच्या मृत्यूनंतर केल्या जाणाऱ्या विधींचा खर्च लक्षात घेता, त्या खर्चात एखाद्या मृत्यूशी झुंज घेणाऱ्या आईवडिलांच आयुष्य लांबल असत. त्यांना योग्यवेळी आरोग्याची काळजी घेतली असती तर त्यांचं आयुष्यातले चार दिवस वाढलें असते. ते आपल्या डोळ्यासमोर चार दिवस असेल तर माझ्या सारख्या तरुणाला तर हत्तीचं बळ नक्कीच येते. समाजात वावरतांना अनेकदा एका गोष्टीचा मी जवळून निरीक्षण केलो. आंपल्या दैनंदिन जीवनात येणाऱ्या ताणतणाव व मानसिक तणावात झालेला वाढ ही चिडचिड करणारी गोष्ट आपण एखाद्या व्यक्तींवर राग राग करून दाखवत असाल तर ती व्यक्ती आपली चाकरी जरी करणारा असला तरी सहन करणारा नसतो, मात्र घरी परतल्यावर ही गोष्ट त्याच व्यक्तिमत्त्वाला कळते ती तुमच्या तानावाने होणाऱ्या चिडचिड असो वा ओरडा ओरड त्यावर कधीच प्रतिकारक उत्तरे देत नसते ते म्हणजे आईवडील.

## सामाजिक जीवनातील कुटुंब

मात्र ते धडपडत असलेली त्यांची धडपड पाहून आपली वाट दाखवण्याची ती वाटेरू असलेले थोर माऊली. स्वतःच्या मुलांमध्ये कधीच नकारार्थी गुणांचे वाचन नकरात, सकारात्मक गोष्टीची संगत घेण्यास नेहमीच प्रयत्नशील असतात ते माझे गुरू. उराशी मोठे स्वप्न बाळगून दिंनरात्र मेहनत करून पोटाला चिमटा घेऊन आज जे आम्हा भावंडांना शिक्षणाच्या वाटेवर सोडले हे त्यांचे उपकार कधीच नविसरणारे आहे. काय माहीत जगाला या गोष्टीचा विसर का पडत असेल. कधी कधी आपले आईवडील आपल्याला समजावून सांगतांना लगेच स्वतःच्या पत्नी समोर मध्येच बस तुला काय कळते, असे उद्गार काढून मोकळे होणाऱ्या अनेकांना मी पाहिलो. त्या क्षणी त्या माऊलीच्या डोळयातील लपलेले अश्रू सर्व काही सांगून जातात.

रक्तातल्या नात्यातुन लोपपावलेली माणुसकी हे समाजाच्या कुठल्या क्षेत्रात माणुसकीचे धडे देतील. जो कोणी स्वतःच्या आईवडिलांना सांभाळू शकत नाही, ते या समाजाला कसे सांभाळतील. लोपपावलेली माणुसकी पुन्हा नव्याने उदयास येईल का. किमान रक्ताच्या नात्यांतील नाळ तरी तोडण्याची वेळ येऊ देऊ नका.

कुटुंब म्हटल्यावर सुख-दुःख सोबतच असतो, समाजात वावरत असतांना सुख मिळावं म्हणून सतत धडपडणाऱ्या या मानवी जीवनाच्या रस्त्यात बरेचसे दुःखाचे खड्डे येतात. प्रत्येक वळणांवर समस्यांचे डोंगर आडवे येतात. धन-संपत्ती अफाट नोकर चाकर मोठा बंगला, चार चाकी गाडी, दहा आकडी पगार अश्या असंख्य स्वप्न उरावर्ती बाळगून समाजात जीवन जगत असतोत.

पैसा, धन संपत्ती हे सर्व काही सुख दुःखाचे साधने नव्हे, मानवी जीवन जगत असतांना प्रत्येक व्यक्ती केवळ सुख शोधत असतो, प्रत्येकांला सुख पैसा, संपत्ती यातच गुरफटून बसलेला दिसतो मात्र सर्वस्व पैसा नव्हे तर तिथे माणसेही जोडण्याचे श्रीमंती जगात दुसरीकडे मिळत नाही. प्रत्येकाला स्वार्थ असला पाहिजे मात्र इतकाही स्वार्थी असू नये की ज्यांच्या स्वार्थापाई इतरांचे मन दुखावल्या जाईल. म्हणून निःस्वार्थ जीवन जगण्याचा प्रयत्न करूया. प्रत्येकांच्या सुख दुःखात सहभागी होऊन समाज सुजलाम सुफलाम बनवूया. अशी मानसिकतेचा प्रभाव केवळ बोलण्या पूरक मर्यादित असते. प्रत्यक्षात मात्र हे कृतिशील होत नाही. हा सर्वात मोठा खंत आहे. प्रत्येक व्यक्ती मी आणि माझं यातच आपलं संसार मांडतोय, समाज आणि मी यात कुठलाच संबंद नाही असं स्पष्टपणे मत मांडतांना दिसून येत आहे. पूर्वी शेजार धर्म नावाचा एक प्रकार होता, ग्रामीण भागात आत्ताही काही प्रमाणात आढळते. माझ्या घरात संकट आले तर शेजार धर्म म्हणून ते संकटाला सामना करण्या समोर यायचा. आणि त्यांच्या घरातील सुख दुःखात निःस्वार्थपणे मदतीला आपण धावायचं. हा क्रम होता, याने समाजात एकोपा नांदत होता. यामुळे आयुष्यात कुठलेच प्रसंग कठीण वाटायचे नाही. प्रत्येक कठीण प्रसंगी कोणीतरी माझं आहे, यापेक्षा मोठी श्रीमंती कुठे मिळत नाही. मात्र कालांतराने तंत्रज्ञानाच्या झपाट्याने वाढत चाललेल्या डिजीटल युगात हा मानवही डिजीटल होऊन गेला. याला अत्ता कोणाचीच गरज भासत नाही. चार पैसे जवळ आले की सगळे नात दूर होऊ लागले. स्वतःच्या आई वडिलांपासूनचे उपकार देखील विसरत चालले आहेत.

मागे काही दिवसांपूर्वी आत्महत्या केलेल्या अध्यात्मिक क्षेत्रातले भय्यू महाराज यांची आत्महत्येच कारण हे कुटुंबीक तणावातून झाल्याचे निदर्शनास येत असून यातून एक गोष्ट मात्र समाजाला शिकायला मिळालीच असेल. पैसे, धन, संपत्ती बंगला गाडी, नोकर चाकर सर्व काही असतांना सुख मात्र त्यांना

लाभलं नाही. कुटुंबाला संतुलित करू शकले नाही. मानसिक ताणतणावाला पैसा ने काही सुखात रूपांतर करू शकले नाही. शेवटी स्वतःला संपवून घेतला मात्र तिथे जगाला एक संदेश देऊन गेला. कुटुंब आणि सामाजिक बांधिलकी जपत गेलात तर सुख काही दूर नाही. माणसे जोडत गेलात एव्हरेस्ट सारखे संकट देखील तुमच्या समोरून पळ काढेल. मात्र तुम्ही हे सर्व सोडून केवळ पैसे आणि लालच याच्या पाटी धावल्यास शेवटी मात्र संकटप्रसंगी तुमच्या मदतीला कोणी येत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. कुटुंब, नातलग, गणगोत यांना सुरक्षित ठेवा, यातील संबंध अधिक द्दढतेने आवळून घ्या. जेणे करून तुमच्या खांद्याला खांदा लावून सुख दुःखात सोबत असतील. हल्ली तर नवीन संसार उभारून संबंद कुटुंबाच्या सहवासात नराहता वयक्तिक स्वतःचा संसार थाटून स्वतःचा भाऊ देखील शत्रू होऊ लागला आहे. वितभर जागेसाठी दोघा भावंडात तुफान संघर्ष होत आहेत. जे लहानपानांपासून एकत्रित प्रेमाणे राहणारे भावंडं लग्नानंतर क्षणांत जवळच नात दूर आणि दूरचे जवळ होत असल्याचे चित्र पाहायला मिळतात, आईवडिलांच्या संगोपनाची जबाबदारी कोण स्वीकारावा ह्यावरुन देखील एकमेकांत तुतू-मीमी होत असत. अश्या समाजात चाललेल्या व्यवस्थेकडे पाहून खूप दुःख होतोय. जिव्हाळा, आपुलकी, समवेत लोपपावत चाललेली माणुसकीकडे पाहून असे वाटते या मानव जातीत आमूलाग्र बदल घडून आला. की तो स्वतःला यांत्रिक समजू लागला. मी आणि माझं हे त्याचं जग आहे. यापलीकडे त्याला कुठल्याच गोष्टीचा संबंद नाही. शहरात मात्र सामाजिक बांधिलकी चे उदाहरण देखील सापडत नाहीत. शेजारच्या घरात दुःखाचा प्रसंग असला तर आमच्या घरात सुखाचे सोहळे होतात. कोणी कोणाच्या सुखदुःखात सामील व्हावे अशी मानसिकता ही लोपापवली. शेजार धर्म ही नामशेष झाली. शेजारी ही केवळ निंदकांची घरे रंगली आहेत. आणि पून्हा उदयास येत असलेली मराठी माणसाची चाल म्हणजे खेकड्याची चाल. समाजात कोणी सामजिक बंधीलकी जपत कार्य करत असेल तर त्याला लगेच पाय धरून खाली खेचणार. ही वृत्ती मात्र अजूनही कायमच आहे.

शेवटी पैसा, धन, संपत्ती गाडी, बंगला, असूनही काही उपयोग नाही, जिथं मानवाला कुटूंबात सुख, समाधान लाभत नाही, तिथे पैसा संपत्ती काही उपयोगी पडणार नाही. शेवटी आपली मानस हीच आपल्या खचलेल्या मानसिकतेला उजाळा देतात. पुन्हा उभारण्याच धाडस देतात. म्हणून सामाजिक

बांधिलकी जपत आपल्या कुटुंबाला, नात-गंनगोतांना आपल्या सहवासात ठेवा, त्यांच्या सुखदुःखात सामील व्हा. तर तुमच्या संकटाप्रसंगी ते धाव घेतील. शेवटी सर्वांना रिकाम्या हाताने परतायचे आहे हे विसरून कदापि चालणार नाही.

## ● शेजार धर्म...

शेजार धर्म नावाचा एक घटक पूर्वी आमच्या ग्रामीण भागात फार पाहायला मिळायचे, आमच्या घरातील साखर संपली की शेजारच्या घरात धाव घ्यायचो. म्हणजे कासव आणि ससाच्या गोष्टीतला पुढचा भागच.. कासव जमिनीवर असतांना  ससा आपल्या खांद्यावर घेई, अन पाण्यावरुन प्रवास करतांना कासव ससाला आपल्या खांद्यावर घेऊन जीवनाचा प्रवास सुखकर करत नेने. माझ्या मदतीला तू धाव घेत चल आणि तुझ्या संकटांना मि येत राहील. ही भावना शेजार धर्मात आम्हला पहायला मिळायचे.

कुटुंब नियोजन भलेही मोठं असले तरी, कुटुंबात तुतुमीमी हे होतच राहत, संख्ये बांधव आपल्या पासून दूर जातात. संकटांना सामना करायला हे कुटुंब देखील विस्कळीत होऊन जातो. संयुक्त कुटुंब व्यवस्था अत्ता फारशी उरली नाही. भाऊ-बहिणीच प्रेम हे त्यांच्या लग्न मंडपपर्यंतच मर्यादित आहे. एकदा का लग्न झालं, की माणूस प्रायव्हेंसी शोधतात. एकटा पण शोधतात. संयुक्त कुटुंबात त्याला बंधीस्थ वाटत. मग घरात कटकट सुरू होते. शुल्लक कारणावरुन वाद होऊ लागतात. आणि या वादेला नवे वाटे फुटतात, स्वतंत्र कुटुंब स्थापनेचा निर्णय हाती घेतात. मग घरांची वाटणी, शेतांची वाटणी. आणि हो आईवडिलांची देखील वाटणी होते.

सुखदुःखात आपले बांधव आपल्या बाजूला नसतात. जेव्हा एखाद्यासमोर संकट उभारत तेव्हा त्यांना सर्वांची आठवण येऊ लागते, मात्र ती वेळ गेलेली असते. अश्या अवस्थेत आपण घरापासून दूर असतोत. कुटुंबातील कोणताच घटक आपल्या बाजूला नसतात तेव्हा हा शेजार धर्मच आपला साथीदार

बनतो. माणुसकी जिथे शुल्लक असते तिथे मदत ही कायमच धावून येत असते. मानवता धर्म शेजारी कोणत्या धर्माचा व जातीचा शोधत नाहीत. संकटांना तोंड देत एकमेकांच्या संगतीत हे जीवन जगणारे शेजार धर्म मानवी जीवनात खूप मोठं मोलाचं घटक आहे. मात्र हे शेजार धर्म नावाचा घटक अत्ता पूर्णपने नामशेष झाली म्हटले तरी काही वावग ठरणार नाही.

ग्रामीण भागातून अत्ता हा सुशिक्षित समाज शहरी भागात घाव घेत चालला आहे. आणि इथे चार भिंतीच्या आड फ्लॅट मध्ये आपलं संसार थाटत आहे. चार भिंतीच्या आत असलेलं आपलं संसार कधी आजूबाजूच्या परिसराचा विचारही करत नाही. शहरात भले मोठे अप्पर्टमेंट मध्ये ज्यांच्या त्यांच्या चौकटीत आपल कुटुंबाचा गाढा चालवत असतांना, शेजारी राहत असलेल्या कुठलाच ग्रस्थाची निधान तोंडओळख देखील करून घेण्यास हा समाज तयारी दर्शवत नाही. म्हणून एकाच्या घरात दुःखाचे प्रसंग असतांना, शेजारी सुखाचे सोहळे होतात. अशीच एक घटना पश्चिम युरोप मधील घडलेली आहे. या घटनेची काही वर्षांआधी, द कॅनबेरा टाईम्सने वृत्त दिले होती. ती घटना वाचून हृदयाला हादरा बसेल अशी घटना. बऱ्याच वर्षांपासून इथे अपार्टमेंट मध्ये एक कुटुंब राहत होत. दिनभर कामात व्यस्थ आणि सायंकाळी घरी परतल्यावर घरच्यांना वेळ देण्यात पुढारी व्यस्थ, या कारणांनी कधी आपल्या शेजारी असणाऱ्या ग्रस्थानची ओळख करून घ्यावे ही वेळच मिळाली नाही. बऱ्याच दिवसांनी या कुटुंबाचा फ्लॅट चा दरवाचा बंद होता. तरी कोणत्या शेजाऱ्यांनी याची विचारपूसही केली नाही. असेच पाच वर्षे लोटले, अन अखेर घर मालकांनी आतून बंद असलेल्या दरवाजा तोडून पाहताच. त्यातील एक व्यक्ती tv च्या समोरील सोपावर सापळा होऊन पडला होता. ना अंगावर कोणते मास उरला ना शरीराची ओळख. पाच वर्षांपूर्वी मृत्यू पावलेल्या या कुटुंबाची दखल ना शेजारी घेतले ना आजूबाजूला असलेले कुटुंब...

शेजारी म्हणजे दररोज त्यांच्या घराचा दरवाजा बंदचालू होत असलेला आवाज, बेलचा गजर, टीव्ही च आवाज, खिडकीतुन ऐकू येणारे कुटूंबातील किलबिल हे शेजार असलेल दर्शविते. काही ग्रामीण भागांमध्ये, आजही खरा शेजारधर्म अनुभवायला मिळतो आणि काही शहरी समाजांमध्ये देखील

शेजाऱ्याबद्दल काळजी बाळगण्याचा प्रयत्न केला जात आहे. परंतु, शहरात राहणाऱ्या अनेकांना स्वतःच्याच परिसरात एकटेपणा जाणवतो आणि सुरक्षित वाटत नाही. अनोळखीपणाच्या भिंतींमध्ये ते कुढत असतात. अनोळखीपणाचे भिंती उभारून एकमेकांना अनोळखी बनत गेलोत, कित्येक वर्ष शेजारी असून देखील शेजारी निधान तोंडओळख नसतो. हा आजचा शेजार धर्म. "दूर असलेल्या आपल्या भावापेक्षा जवळ असलेला शेजारी बरा", अशी म्हण आहे कुटुंब एकवेळ दूर होईल मात्र शेवटच्या स्वासापर्यंत हा शेजारीच आपल्या मदतीला येईल. अशी प्राचीन भावना आहे, ही भावना लोपापवली.

## ● समाजकारण का राजकारण... ?

या पृथ्वी तलावर अनेक सजीवांपैकी बुद्धिवान प्राणी म्हणून या मानव जातीस ओळखतात, अनेक वर्षांपासून हा मानव स्वतःच्या अस्तित्वासाठी लढत आहे, जीवन एक संघर्ष म्हणून सकाळ पासून रात्री उशिरा पर्यंत धावपळीत जीवन जगत आहे, हा मानव सध्यस्थीतीला मी आणि माझं या दोनच गोष्टींसाठी अतूट प्रयत्न करतांना दिसत आहे.

समाजासाठी लढणारे, स्वतःच्या अस्तित्वासाठी नाहीतर या समाजासाठी वेळ देणारे लाखतले एक असतात, समाजावर संकट उभारलं तर धाव अनेक घेतील पण त्या धाव घेण्यात वर्चस्व साधणारे, स्वार्थ साधणारे समाजसेवक आज घडीला निमार्ण झाले आहेत, अश्या समाजसेवकांना कोणत्या अंगाने समाजकार्य करतो म्हणावं, एखाद संघटना, संस्था उभारली की त्या संस्थानाच्या छताखाली आपले अनुयायी लादून घेणारं अन आपल्या परीने आपलं बळ निर्माण करणार, वर्चस्व निर्माण करणार, आणि पुढील भविष्यासाठी (स्वतःच्या) लढा देणार हे निर्माण झालेली समाजातील व्यथा, खरतर ही व्यथा "नवऱ्याने मारल अन पावसाने झोडपले, दाद कुणाकडे मागायचं. ?"अशीच आहे.

गावपातळीवर एकदा कार्यकर्ता उभारतो, आपल्या गावासाठी झगडतो, अन वरील पुढारीच्या दावणीला बांधलं जात याला काय अर्थ ?, एक छोटंसं उधाहरण, एका गावात गणपत पाटील आमदार साहेबांचा सच्चा कार्यकर्ता, साहेबांसाठी तळमळीने कार्य करतो, गावात एकही मत दुसरी कडे जाता कामा नेये यासाठी तुटून कार्य करतो, मग आमदार साहेब अश्या छोट्या छोट्या कार्यकर्त्यांकडून आपलं मोठं स्वप्न उभारत, पाच वर्षांनंतर गणपत पाटील पंचायत समितीची निवडणूक लढवाव या साठी आमदाराला

भेटतो, आमदार म्हणतो तुझं जागा फिक्स, फॉर्म च्या शेवटच्या दिवशी गणपत पाटलाला वाड्यावर बोलावून डाव खेळतो अन गणपत पाटलांचा अर्ज भरणे थांबतो, स्वतःच्या नातेवाईकांतील एकाला उमेदवारी  देऊन पुन्हा गणपत पटलांसारख्या कार्यकर्त्यांना उभारून तेही निवडणूक जिंकतो, असेच क्रम चालू असते, गणपत पाटील पुन्हा पुढच्या पाच वर्षांनी तिकिट विचारतो पुन्हा नातेवाईक येतो पून्हा पक्षासाठी काम करतो, अस चालत चालत गणपत पाटील शेवटी संपला मात्र त्याला न कुठली निवणूक लढवता आलं नाही ना कुशल अस्तित्व, ही परिस्थिती अजचीच आहे, प्रत्येक नेता प्रत्येक पुढारी आमचा वापर करत आहे हे आजचे तरुण वर्ग विसरून चालणार नाही, साहेब साहेब म्हणून आपण आजही या पांढऱ्या पुढाऱ्यांच्या चपला सांभाळत गुलामीत जीवन जगत आहोत, एखाद्या भाकरीच्या तुकड्याची आश्या बाळगून कुत्रा सारख मागे फिरत आहोत, साहेब बी चालाक कुत्रांना कधी उपाशी ठेवत नाही, उपाशी ठेवलं तर दुसरा काही बदल पडणार नाही केवळ झेंडा बदलतो, माणसे तीच विचारसरणी तीच, आश्या तीच. ही मानसिकता कुठून निर्माण झाली या मानव जातीला, का असा स्वार्थपणाला कवटाळून बसलाय हा समाज, कोणी वाली नसेल का याला, मग अस म्हणावं लागेल या देशात माणुसकी नावाचा शब्द कोलमडून गेला, नामशेष झाला, असे म्हणायला काही वावग ठरणार नाही.

या बुरसटलेल्या विचारसरणीतुन हा माझा समाज(मानव जात) किती दिवस प्रवास करणार अन यात त्यांचं काय साध्य होणार, खायचे आणि दाखवायचे दात वेगळे का असतात, अश्वासनांनी लोकांचे बुद्धी भ्रूष्ट करणारे हे लोक कोण? हा सर्वसामान्य नगरिकांचा प्रश्न आहेत, निःस्वार्थ जीवनाचा स्वास कधी कोणाला मिळाला नाही, ना कधी कोणाला देऊ इच्छितात, हा माझा समाज, हा आपला समाज म्हणत केवळ मिरवून चालत नाही तर त्यास आपलेपणाची उब देणे त्या नेत्यांच, त्या पुढार्यांचं काम नव्हे का.. ?, खरतर या मानव जातीला पैश्याच वेड ग्रासले आहे, या नोटा साठी आज हा असा जीवन जगत सुटलाय, त्या तुपड्या रुपया साठी हा मानव स्वतःच्या भावाला देखील गजाआड करतोय, मायेचं ममतेच हात म्हणून कधी कुणाच्या खांद्यावर ठेवत नाही, याला कसे म्हणावं माणूस.. ? बहिणाबाई

चौधरी म्हणतात, "माणूस रे माणूस तुझी नियत बेकर, तुझ्या विना बरा गोठ्यातला जनावर", बहिणाबाईंने या माणसांच्या हावेला गोट्यातल्या जनावरांपेक्षा पलीकडची उपमा दिली, जनावरांना दिलेल्या चाऱ्यात गुरे समाधान तर व्यक्त करतात, मात्र हा माणूस कितीही मिळालं तरी आपली झोळी मात्र अजूनही समोरच असते, हीच मानसिकतेतून या देश्यात राजकीय पुढाऱ्यांचा जन्म होत आहेत.

मग अश्या अवस्थेत या तरुण वर्गाचं कार्य काय, तर तरुणांनी अश्या भ्रष्ट राजकीय व सामाजिक कार्यांच्या नावावर लुबाडणाऱ्या दृष्ट राजकारणी माणसापासून दुरच राहिलेलं बर, दूर म्हणण्यापेक्षा अश्या नेत्यांना वेळीच ठेचून काढणे काळाची गरज आहे, ठेचून म्हणजे वैचारिक दृष्टीने, समाज संघर्षाने आणि युवा शक्तीने, आपल्याला मिळालेल्या अधिकाराणे, आपला लढा केवळ सत्याच्या दिशेने, अहिंसेचा मार्गाने व सामाजिक दृष्टीने एक पाऊल स्वतःपासून सुरवात करु आणि अश्या दृष्ट नेत्यांकडून होणाऱ्या संविधानाचा, अभिव्यक्तीचा ऱ्यास थांबवण्यासाठी लढा देऊ, हेच लढा शाहिद भगतसिंग यांनी दिल होता, हाच लढा भगवान बिरसा मुंडानी प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधात उभारला होता, याच मार्गाने आपलाही लढा असला पाहिजे, समाज कार्य म्हणजे, महापुरुषांच्या झीजलेल्या आयुष्यातून दिसते, स्वतः अस्तित्व मिटवून हा प्रख्यात समाज स्थापने म्हणजे समाजकार्य होय, याच पार्श्वभूमीवर महात्मा फुलेंनी आपल्या पत्नी सावित्रीमाईंना एक सांख्यिक उधाहरण देऊन समाज कार्याची ओळख पटवून दिले, सावित्रीमाई कडून एका ज्वारीचे बियाण मातीत रुजवण्यास लावले व त्यास खतपाणी घालून तब्बल सहा महिन्यांनी त्या बियाणाचे रोपट्यात व रोपटीचे झाडात निर्माण होऊन, त्यास एक कनस उगवले, सावित्रीबाई फुलेंना ज्योतिबांनी ते कणस आणण्यास सांगून त्या कनसात सुरवातीचा पेरलेला बियाणे शोधण्यास लावले, यावरून ज्योतिबा म्हणतात सावित्रीमाईंना की जो माणूस या बियांना सारख स्वतः झीजतो आणि कनसरुपी समाजाला उभा करतो न तोच खरा समाजसेवक आणि तोच कार्य मला अपेक्षित आहे, यावरून त्यांनी केलेल्या कार्याची, व उभारलेल्या चळवळीची शोभित चित्र दिसते…

मानवी जीवन म्हणजे बऱ्यांचं अकांक्षाने समोर येतो, माणूसपण, माणुसकी आपुलकीच्या भावना या राजकीय संघर्षात सर्व काही दूर ठेवून मानव आपली भूमिका बजावत असतो, नक्किच सामाजिक

जीवन जगत असतांना मनुष्याला या राजकीय वाटचालीशी जुडावे, मात्र आपली माणूसपण इथे शाबूत ठेवणे काळजी गरज आहे. एटगे अनेक राजकीय नेते पाहायला मिळतात, आपल्या स्वार्थासाठी आपल्या आड येणाऱ्या प्रत्येकाला संपवत जातो, याने आपापसात वैर निर्माण होतो, हा वैर राजकीय नेत्यांचा नसून हा वैर त्यांच्या कार्यकर्त्यांचा असतो. लोकप्रतिनिधी मात्र स्वतःच्या अंगाला धक्का लागू नदेता हे सर्व एक सामान्य कार्यकर्त्यांच्या मुलावर देतो, ही मोठी शोकांतिका आहे. म्हणून सामाजिक जीवनात आपला रस्ता, आपले निर्णय हा स्वतःचा निवडा. जेणे करून स्वतःच आयुष्य अश्यात गुरफटून जाऊ नये.

## ● माणवता हाच खरा धर्म... !

आपल्या देशभरात आनेक महापुरूष होवून गेले, कोणी राष्ट्र हितासाठी तर कोणी राष्ट्राच्या आस्तित्वासाठी लढे देत, स्वतःचे प्राण पणाला लावून, देशाचे अस्तित्व टिकवून ठेवले, महात्म्यांपासून ते साधू संतापर्यंत, समाज प्रबोधन व समाज सेवा वेटीस धरून आपला माणवतेचा, माणूसकीच्या धर्माचा अजेंडा कितीतरी वर्षांनी ठिकवून ठेवले.

जो कोणी देशासाठी, समाजासाठी लढला, तो आजही या जनमानसात जिवंत आहेत, जे की आपण आजही त्यांची जयंती-पुण्यतिथी अगदी थाटामाटात, उत्साहात साजरी करत आसतो, या ब्रम्हांडाची निर्मीती ही निसर्गाच्या खाणीतून झाली, पृथ्वीतलावर सजिवसृष्टीची निर्मीती झाली, आणि माणव जात ही उगम पावली, कालांतराने या अदिमाणवांपासून माणवतेकडे परिवर्तन होत राहील, यात अनेक महापुरूष जन्माला आले, आणी हा माणव आपापसात जाति धर्माच्या भिंती उभारल्या, प्रत्येक जातीत विद्वान माहात्मे जन्माला आले, आणी प्रत्येकांनी माणवतेचा प्रसार केला, सर्वांनी आपले धर्माच्या आधारावर नसून, प्रास्थापित व्यवस्थेला लाथाडून, अन्याय आत्याचारास सामना करत, माणवता धर्म स्थापित केले, आता मानवता धर्म म्हणजे काय? तर माणुसकीचे वर्तन म्हणजे मानवता धर्म, जे जे मला हवे ते ते दुसऱ्याला देण म्हणजे माणुसकी. गाडगे बाबांनी भुकेलेल्यांना अन्न दिले, तहानलेल्यांना पाणी पाजल, रोग्यांची सेवा केली, धर्मशाळा बांधल्या, आणी आजही आपण आपल्यात गाडगेबाबांना शोधत आसतो, तसेच गेल्या साडे चारशे वर्षापासून या बहूजन समाजाला शिक्षणापासून दुर लोटले गेल होते, अश्यात सावित्रीबाई फुले, महात्मा फुलेंनी जगातली पहिली मुलींची शाळा काढले, आणी स्त्री शिक्षणाची मुहतमेढ रवून, बहूजन समाजातल्या स्त्रीयांना चुल आणी मुल यापलिकडचे शिक्षण दिले, महात्मा फुलेंना एका ब्राह्मण मित्राच्या लग्नात अस्पर्शीत मुलगा ही निच्छी व तुच्छ माणल्याने, फुलेंनी त्यावर आपल पाऊल उचलत, सत्यशोधक समाजाची स्थापना केली, हे खरे मानवता धर्माचे पाईक

आहेत, जो कोणी स्वार्था साठी नसून या समाजासाठी आपले प्राण अर्पित केले ते आजही आपल्यात जिवंतच आहेत.

महाविर गौतम बौद्धांचे तत्वज्ञान व धर्म हा माणवतेचा मार्ग दर्शविते, जगाच्या पाटीवर माणसांनी माणसांशी कसे वागावे, व कसे जगावे हे जर कोणि शिकवत आसेल तर तो बौद्धांचे तत्व आहेत, जगात शांतीचे प्रतिक सबोधीत या बौद्धांची प्रतिष्ठा करतात, तसेच हिंदू आसो वा मुस्लिम, किंवा ख्रिस्चन आसो वा शिख, यात कुठलाच धर्म व त्या त्या धर्मातले माहात्मे व महापुरूष हे माणवतेचाच अजेंडा पेरलेला दिसतो, जगाच्या पाटीवर माणूसकी पेक्षा कुठलाच मोठा धर्म तुम्हाला सापडणार नाही, सर्वच धर्म मानवाच्या ऐहिक आणि पारलौकिक सुखासाठीच विचार करतात, तसे छ. शिवराय आसो वा छ. शाहू महाराज यांनीही कुठल्याही जाती धर्मात तेढ दर्शविले नाहीत, उलट अस्पर्शीत समाजाला आपल्या बाजूला बसवून एका ताटात जेवन करणारे हे महामानव होते, छ. शिरायांनी कधिच कुठल्या धर्माचा व जातीचा अपमान केला नाही, उलट ते सर्व धर्माचे पाईक होते, त्यांच्या सैन्यात आठरा आलुतेदार, बारा बलुतेदार आसे सर्व जाती धर्माच्या सैन्याचा समावेश होता.

ऐवढं सार आसतांनी आज समाजात या वरिल महापुरूषांना वेगवेगळया जाती धर्मात विभाजित करून ठेवलेत, आपापल्या महामानवांची जयंती-पुण्यतिथी भल्या थाटामाटात साजरी करतात, डाॅ. बाबासाहेब म्हटले की, बौद्ध समाज पुढाकारीत असेल, शिवराय म्हटले की मराठा समाज, आण्णा भाऊ साठे मातंग समाज, महात्मा फुले माळी समाज, तर महात्मा बस्वेश्वर लिंगायत असे या समाजात समिकरण तयार झाला आहे, आपापल्या समाजचे महापूरूषांची वाटणी करून घेतलेल दिसेल, आणी जयंतीच्या नादात आपापसात वाद विवाद सुरू होते, खरेतर हे कुठल्याच महापुरूषांनी आपल्या धर्माला श्रेष्ठत्व दिला नाही, तर सर्वात आगोदर माणवतेला श्रेष्ठत्व दर्शविले आहे, यांचे जन्म जरी वेगवेगळया जाती धर्मात झाले आसले तरी त्यांचे विचार मात्र एक आहेत, त्यांनी स्वतः साठी नव्हे तर जनसमान्यांचा विचार केलेत, आणी आज आपण त्यांची जयंती साजरी करतो, ते डिजेच्या तालावर आमचे पावले

तिरकतांना दिसतात, आम्हाला त्यांचे विचार घ्यायचे आहेत, आज मी पाहतोय भारतरत्न बाबासाहेबांची, छत्रपती शिवरायांची जयंती आम्ही आमच्या चाळीत साजरी करतो ते दुसर्यांच्या तठावटीत, समाजा समाजात जयंती निमीत्त वाद विवाद, हि एक समाजाची शोकांतीका आहे, कारण जो कोणी वाद करतो त्यांना आजूनही हे महामानव समजले नाहीत, आजूनही आमच्यात माणवतेचा दिवा तोलत नाही, आजूनही आम्ही माणूसकी पासून लांब आहोत, आजूनही आम्ही त्या भुरसटलेल्या जाती धर्मात गुरफटून बसलोत, संत कबिर म्हणायचे,

जाती न पुछ साधूकी,

पुछ लिजिऐ ज्ञान... !

आज आपण साधू संतांची जात पाहतोय परंतु विचारांकडे दुर्लक्ष आसते, हे सोडून आयुष्यात माणवतेचा संदेश देणार्या महापुरूषांच्या विचारांची मशाल पेठवत, आपल्या आयुष्यात  दुसऱ्यांच्या सुखासाठी, आनंदासाठी, हितासाठी काही करू शकत असू तर आपणही मानवता धर्माचे पाईक असू. जात धर्म वंश या पलीकडे मानवता हाच खरा धर्म आहे. संधुसंतांची/महापुरुषांची शिकवण हीच आहे. मानवतावादी धर्माचा पाईक व्हा.. असे गडगेबाबांची शिकवण आहे, ते आयात होते तेव्हा त्यांच्या कीर्तनाचे बोल साऱ्या विश्वाला पेलत होते, दगड धोंड्यात देव शोधणाऱ्या मानवांनो, माणसात देव शोध देव तिथे मिळेल, अशी आपल्या परखड वाणीतून ते आपला मानवतावादी धर्माचा प्रचार केला. माणुसकीचा धर्म शिकवणाऱ्या महापुरुषांची आज समाजात विसर पडत चालली आहे. जाती धर्माच्या भिंती अजून मजबूत होत चालले आहेत. रंगांची वाटनी, महापुरुषांची वाटणी झाले आहेत. महापुरुषांना डोक्यावर घेऊन मिरवन्या पलीकडे डोक्यात घेऊन मिरवतील तेव्हा देशात महापुरुषांच्या विचारांचा सुजलाम सुफलाम देश सर्वांगिण मानवतावादी धर्माने नटलेला दिसेल. म्हणून हजारो वर्षापासून संधुसंतांनी हेच शिकवण दिली, मानवता हाच खरा धर्म आहे. माणुसकी हाच खरी जात. म्हणून साने

## ● सामाजिक व व्यवहारिक जिवनातिल प्रेम

प्रेम, भावना, संवेदना, सुख, दुःख, रडने, हसने हे सर्व माणवांचे अलंकार आहेत, प्रत्येकाच्या अयुष्यात ह्या गोष्टींचा स्पर्श झाल्याशिवाय हे जगण व्यर्थ आहे, जर तुम्हच्या अयुष्यात ह्या गोष्टी अनुभवले नसेल तर पुढे नक्कीच त्याचा स्वाद तुम्हाला मिळेल, अश्या भावनात्मक गोष्टी, अगदी आपल्या वयोमानानुसार बदलत जातात.

'लहान पण देगा देवा, मुंगी साखरेचा रवा' संत तुकारामांचे हे ओळी कुठे या तारूण्यात आम्हाला समजायला लागलेत, ते लहानपण म्हणजे कुठल्याच प्रकारचा ताण तणाव नसलेला, मोकळ्या श्वासात जिवन जगणारे ते दिवस आपल्याला आठवणे साहजिक आहे, ना कुठल्याच प्रकारचे वेदना, ना कुठल्याच प्रकारचे तणाव, ना व्यावहारिक गोष्टी, ना सामाजीक, निर्मळ, निरागस, कोमल आसलेला तो बालपण आज मात्र प्रत्येकाला हवेहवेसे वाटते, का तो दिवस माझ्या जिवनातून सर्रास पणे लुप्त झाले, का ते दिवस मला टिकवून ठेवता आले नसेल, आजचा तारूण्याचे दिवस नक्कीच कुठल्यातरी तणावाने, वेदनांने उगवतांना आपणा सर्वांना दिसत आहे. तसाच माझ्या पण बालपणींच्या आठवणी माझे नेहमीच लक्षवेधून घेतात.

तो बालपण म्हणजे मौज मजा मस्ती, हे केवळ वयाच्या मर्यादित काळापर्यंत, वयवर्ष अठरा गाठली की प्रत्येकांची मणोवृती तारूण्यात पदार्पण होते, नवि दुनीया, नवि आशा, नवि मीत्र, नवे मैत्रिनी सर्व काही नविन जग आपल्याला पहायला मिळते, अगदि याच वयात नकोत्या वेदनांशी जूळून अयुष्याच्या नव्या

पर्वाला सुरवात होते, हे वयच अडणीड असल्याने या वयात अनेक मार्ग आपल्या समोर दिसतात, तर कोणी व्यसनाला कवटाळून अयुष्याची वाटचाल करून, व्यसनात अयुष्य उद्ध्वस्त घालून जगणारे युवक आपणांस पहायला मिळतात, तर दुसरीकडे प्रेम या अडीच अक्षरी नावाच्या प्रसंगांना कवटाळलेले, तर कुणी या पासून दुर राहण्याचा प्रयत्न करतो, मात्र यासर्व गोष्टी प्रत्येकजन स्वतःच्या भल्यासाठी वा स्वार्थासाठी केलेले जानवते, असेच काही प्रेमळ मित्र वा नातलगांना दुरावा निर्माण करणारेही आनेक गोष्टी दैनंदिन जिवनात घडत आसतात, आपण पाहतोय, लोक रस्त्यावरच्या भिकार्यांना पैसे देतांना हातातल्या नानांन्या चार वेळा तपासून पाहतो, तो नाने एकचाच आहे ना.. ?, या शंकेने परंतु हातातल्या नान्यांची किंमत काही दहा विस रूपयांची नसते, ते केवळ पाच रूपयाच्या आत, परंतु आपण बर्याच ठिकाणी हे आणूभवले असेल अश्या गोष्टीकडे हा समाज फारच बारकाईने वा संकोचीत पणे विचार करायला लागला आहे.

प्रेम, दया, वात्सल्य, परोपकार यासारखे माणूसकीचे आलंकार माणवांच्या दैनंदिन जिवनातून कधिच लुप्त झाले आहेत, आज आपण पाहतोय, सकाळी उठल्या पासून ते रात्री झोपे पर्यंत या मानवाला काही ना काही कार्य सतत हाताळले जातात, आणी दिवसेंदिवस हा माणव केवळ पैश्यांच्या गठ्यांकडे वाटचाल करत आसतो, त्यात काहिच वा कुठलाच नाते वा जवळीकता यासारख्या गोष्टींना किंमत देत नाही, मि व माझ संसार हि दुनीया आजच्या माणवांचे स्वप्न, मग प्रेमाची भाषा वा प्रेमाची किंमत आजच्या पिढींना समजेल तरी कसे ?, निधान आज स्वतःच्या कुठूंबासोबत, मुला बाळांसोबत तरी प्रेमाने वागतात का. ?, बर्याच ठिकाणी मि पाहतोय दिवस भराच्या तणावांना सायंकाळी घरी परतणारा प्रत्येक व्यक्ती आपल्या कुठूंबातील सदस्यांवर किंवा मुला बाळांवर कुठल्या ना कुठल्या कारणांवरून तो संतापतो, चिडचिड करतो, हि मनोवृत्ती, हि मनोविकार सर्व काही स्वार्थी आसते, आज ही स्वार्थपणाचे लक्षणे सर्वांगीन जिवनात सलग रित्या प्रवेश करतोय, स्वतःच्या पत्नी सोबत, स्वतःच्या आई-वडिलांसोबत वागणूकीत प्रेम ही भावणाच दिसत नाही, मग ते दैनंदिन युवा जिवनात येणारा प्रेम आणी त्या प्रेमाला एक वेगळीच वळण देणारे आज आपणांस पहायला मिळतात, हिर-रा ॅंजा, लैला मजनू सारख्या प्रेम युगलांना आज कुठल्याच प्रेमाची उपमा देने शक्य नाही, केवळ ते प्रेम बोटावर

मोजन्या इथके आज आपणांस पहायला मिळतात, केवळ प्रेम म्हणजे एखाद्या प्रेयसी वर केलेल प्रेम नव्हे, प्रेम समाजावर देखील करता येतो, तसे सुरवात स्वतःच्या आई वडीलांपासूनच होते, त्या परिने ते प्रेमाचे संस्कार आपणांवर पडलेले आसतात, ते इतरांवर देतांना संस्काराची जाणीव ठेवणे तितकेच महत्वाचे असते.

खरच आजच्या युवकांना विचारावेसे वाटनारा प्रश्न म्हणजे "प्रेम म्हणजे काय रे मित्रा.. ?", तर त्यांच्या कडून येणार्या उत्तारांची मी नेहमीच प्रतिक्षेत आहे, आजपर्यंत विचारण्यात आलेला प्रत्येक व्यक्तिंकडून मला पुरेसे उत्तर मिळाले नाही, मानवांच्या जगण्यामागील हेतु व त्यांच्या विचार करण्याची पद्धत लक्षात घेता येतो, या लेखाचा उद्देश म्हणजे आजच्या तारूण्यात आपण प्रेम या संकल्पनेला एक वेगळीच वळण देत राहीलोत, प्रेम हि भावना व त्या भावनेतून निर्माण होणारा माणूसकी लोपपावेल का अशी भिती मात्र सदैव असते, माझ्या लिखाणा मागील उद्देश समजणार्यांनी नक्कीच प्रेमाची व्याख्या सांगतील. आणि ज्यांना प्रेम समजले ते आपल्या कुटुंबांना कधी एकटे सोडत नाही.

## ● निसर्ग म्हणजे मानवी जीवनाचे अस्तित्व...

अत्ता तुम्हाला पडलेला प्रश्न असेल, माणुसकी आणि निसर्ग यातलं अंतर काय.. ? तर, वाचकांनो आपण अनेक वेळा एक गोष्ट निदर्शनास आलीच असेल ती म्हणजे, जेव्हा जेव्हा या मानवी जीवाला दुःख, वेदना, तणाव सारख्या समस्यांना सामोरे जावे लागते, तेव्हा या मानवी प्राणीला हा निसर्गच आठवतो, निसर्गाचं सौदर्य जणू आमच्या दुःखांनी भरलेल्या या हृदयाला आनंदाने हेलावूंन सोडतात, असे अद्भुतमय दृश्य दर्शन देऊन जणू सारा दुःख नाहीसा होतो. दिवस भरच्या कंटाळवाणा जीवनाच्या संघर्षात सायंकाळ किती आशेने भरलेले असत. थकावट उरावर्ती घेऊन घरी परततांना कधी आमच्या शरीराची ऊर्जा नाहीसे होईल काही कळणारच नाही अशीच गत होते ना, अश्या अवस्थेत जर निसर्गरम्य परिसरात आपला जीवनाचा आनंद लुटण्यासाठी गेलात तर किती मज्जा असते. तो परिसर आपल्यासाठी आनंदमय असतो. तो निसर्ग आपल्या सानिध्यात येणाऱ्या प्रत्येकांना तो आनंद पुरवीत असतो. त्या निसर्गाला ना ठाऊक असते ते जात, पात, धर्म तो सर्वांना समान सावली, समान आनंद, समान ऊर्जा, व समानच रूप दर्शवितो. समाजात चाललेल्या हे बुरसटलेले विचार आणि त्या विचारांचा जर प्रभाव या निसर्गावर पडला असता तर.. ? स्वार्थ पणा बाळगले असते ना. जस आज आपण बाळगतो. मी आणि माझं पण हे निकसपणे जपतो. निसर्गाला नसतात भावना ना संवेदना, ते निःस्वार्थ असतात, संत तुकाराम महाराज म्हणतात ना, 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे, वनचरे.. ', हे झाडे, हे निर्मळ व निःस्वार्थ पणे वाहणाऱ्या नद्या, दऱ्या डोंगरे, आकाशात उंच भरारी घरणारी पक्षी, जमीनीवर धावणारे प्राणी, पाण्यात पोहणारे जलचर. हे आम्हा सजीवांचे सोयरे आहेत. मानव जाती पलीकडे ते त्यांचं कर्तव्य पूर्ण करतात. निर्सगाच्या सानिध्यात वावरतांना त्यांच्या प्रत्येक क्षणात आपल्याला काहीतरी शिकायला मिळते. आकाशात उंच भरारी घेणाऱ्या पक्षाकडून आपणास जीवनात उंचावर पोहचण्याचं बळ नक्की मिळते. त्यांच्या निःस्वार्थ व निर्मळ भावनेतून समाजात निःस्वार्थ पणाची

जाणीव होते. मानसिक ताणतणावातून क्षणिक मुक्तता मिळते. निसर्गरम्य वातावरणात सहसा सर्वांनाच फिरायला आवडते.

उन्हाळा आला की आपण स्वतःच्या मोटार गाडीसाठी एखाद झाडाची सावली शोधत फिरतो, सावली साठी वणवणत असतांना त्या झाडाची, निसर्गाची किमया मात्र काही कळत नाही. प्रशासनाने कोट्यवधी झाडे लावण्याचे संकल्पना हाती घेऊन अनेक रोपट्यांचे लागवड केली, त्यात आपणही निःस्वार्थ पणे त्या झाडा सॊबत सेल्फी घेण्याची फंडा केलात. सोशियल मीडिया वरून अनेकांनी प्रसारण केलं. मात्र आजची अवस्था बिखट झाली आहे. झाडे लावली खरी पण त्याच संगोपन कोण करणार.. ? असा प्रश्न तर कायमच आहे. या संगणकी युगात निर्सगाच दुर्दैवी अवस्था पाहता मानव आणि निसर्ग यातील नात लोप पावत चालली असे म्हणायला काही वावग ठरणार नाही. हल्ली सर्व डिसीटल झाले आहे. नैसर्गिक सौदर्य नामशेष होत चालली आहे. मोबाईल, संगणकाच्या साहयाने मुलांना देखील त्या नैसर्गिक सौदर्याचे छायाचित्रे दाखवुन त्यांना देखील मानसिक गुलाम बनवत चालोत. वर्षातून एकदा कुठेतरी काँक्रेटच्या जंगलात मानवनिर्मित निसर्गाच्या सौदर्याचे दर्शन घडवून देतांना आज पालकही उत्सुकेत आहेत. लहान मुलांना जे संस्कार पाहिजे ते अत्ता संगणकाच्या साहयाने मिळू लागले, त्यामुळे पशु, पक्षी, प्राणी, दऱ्या खोरे यासर्वांची ओळख देखील त्यांना संगणकाच्या माध्यमातून मिळू लागली, प्रत्येक्षात सर्व काही पाहण्यास त्यांना मिळणे कठीण झाले आहे. विशेष शैक्षणिक सहलीचे आयोजन करून शालेय जीवनात त्यांना निसर्ग व प्राचीन निसर्गनिर्मित सौदर्याची ओळख देखील करून देतांना आज पाहत आहोत.

माझा जन्म ग्रामीण भागात झाल्याने बालपण सर्व या निर्सगाच्या काळया मातीत गेलं. रानावनात फिरकण्यात, नद्या तलावात पोहण्यात आणि मैदानी खेळ खेळण्यात आम्ही तरबेज होतोत. दूरध्वनी सारखे यंत्रणे उपलब्ध नसल्याने निर्सगाच्या संगतीत माझे बालपण गेलं. ते हिरवीगार झाडे, अनवाणी पायाने काळी माती तुडवीत झाड्यावर पिकलेले फळे चाखत प्रत्येक ऋतूचा आनंद घेतलोत. कालांतरानं वय वाढत गेलं. संगणकीय दुनियेत प्रवेश करत गेलोत आणि आमच्या बरोबरच ते निर्सगाच्या सानिध्यात वसलेल गोडसपणा ही लोपपावली. हल्ली त्या मैदानी खेळाची जागा संगणक व मोबाईल ने घेतली

आहे. प्रत्येक मुलांच्या हातात मोबाईल आला. आणि मैदानी खेळ असो वा निर्सगाच संगत हे नाळ तुटत गेली. आज शहरातील उन्हाळयतील वातावरण पाहता फार गांभीर्य दिसत आहे. सर्व यांत्रिक उपकरणांतून मिळणारी हवा हे उखडत्या शरीराला थंड करतोय, फ्रीज सारख्या यंत्रणेने मानवाची दाहकता भागवत आहे. या कारणास्तव आमच्या घरासमोरील अंगणातले हिरवीगार झाडे नाहीसे झाले, झाडाच्या बुडाला असलेलं रांजण ही लोपपावली. जे नैसर्गिक रित्या मानवाला जोपासणारे सर्व निर्सगाचे साधने नामशेष होत चालली आहेत.

आपण निसर्गाची साथ संगत सोडलो असलोही मात्र निसर्गाने आपल्याला सोडलेल नाही. सकाळी सूर्य उगमापासून ते मावळण्या पर्यंत त्यांच्या सौदर्यात कुठे कमी भासत नाही. झाडांवर उमगणारी कळी तोच रंग अंगावर्ती पांघरून घालून उगवतो, दऱ्या खोऱ्यातून कोसळणारा पाण्यात आजही तेच निःस्वार्थ भावना दिसते. ग्रामीण व शहरी भागात शुल्लक असलेले झाडेही सर्वांसाठी तेच सावली देतांना दिसतात. निसर्गाच्या कणाकणात साठून असलेले सौदर्याची आनंद तोच घेतो जो निसर्गाच्या गाभाऱ्यात पूर्णतः विलीन होतो. रस्त्यांच्या बाजूला नजरेआड असलेल्या वनस्पती, बागेतल्या फुलांतून, व मावळयात सुर्यातून मिळणारा प्रसन्नता ही न्यारीच असते. डिजीटल दुनियेत कॅमेराने मानवांचा तिसरा डोळा म्हणून परिचित झाला आहे. मी ही माझ्या तिसऱ्या डोळयात काही निसर्गाचे सौदर्य साठवून ठेवलो. प्रत्येकांनी मिळेल ते निसर्गाची संगोपन करत गेलोत तर नक्कीच नामशेष झालेल निसर्ग पुन्हा आपल्या पदरात पडेल.

निसर्ग आणि मानव यातील नात हे फारसा दूरच नाही, मानवी जन्म हा या निसर्गाच्या सानिध्यात झाला, मानवाचे प्रत्येक अकांक्षा आजही हा निसर्गच पेलत असतो. याच निसर्गातून आम्हला जगण्याची दिशा मिळाली, याच निसर्गात आपण उगम पावलोत, आणि याच निर्सगाच्या गाभाऱ्यात आपला अंत होणार हे कदापि हा मानव प्राणी विसरून चालणार नाही.

## ● पर्यावरण आणि मानव

"वृक्षवल्ली आम्हा सोयरी, वनचरे" या अप्रतिम अभंगात राष्ट्रसंत तुकोबांनी निसर्गातील पशुपक्षी, लतावेली यांचे नितांत सौंदर्य आपल्या सर्जनशिलतेने टिपले आहेत. हा अभंग तुकोबांची अनुकंपा, सर्व सजीव सृष्टी बरोबरचे त्यांची तद्रूपता याचे मनोहर आकलन दर्शवतो, वृक्षवल्ली हे आम्हा मानव जातीचे नातलग असल्याचं त्यांनी आपल्या अभंगातून स्पष्ट केले, निसर्ग आणि पर्यावरण हा मानवी सृष्टीचा उगमस्थान आहे, याच निसर्गाच्या कुशीत या समस्थ मानवांचा जन्म झाला, हजारो वर्षापासून निसर्गाचं आणि मानवांच्या नात्यात तुटवडा निर्माण होतानाचे चित्र आज उद्धभवत आहे. मानवांनी आपली घर असलेल्या निसर्गापासून दूर होत गेल्याचे चित्र दिसत आहेत. हा काळयुगी मानव थोडा स्वार्थीही, अहंकारी, ही झाला, याला ना निसर्ग आपले पाहुणे लागतात ना मानवता याच धर्म..

नेहमी कानावर पडणारा परवलीचा झालेला शब्द म्हणजे पर्यावरण होय. आज पर्यावरणाची स्थिती खुप ठासाळलेली आहे. प्रत्येक व्यक्ती पर्यावरणाबाबत काही ऐकतो किवा बोलतो तरी पण त्याप्रमाणात पर्यावरण रक्षण व संवर्धनाचे ठोस प्रयत्न होताना दिसत नाही. वैज्ञानिक प्रगती इतकेच माणसाने जर पर्यावरणाच्या रक्षणाकडे लक्ष दिले तर आज ही पर्यावरणाची बिखट परिस्थिती उद्धवली नसती. निसर्गाने विविध सजीवांमध्ये संतुलन निर्माण करून ह्या सृष्टीला सजविले, पण मानवाने निसर्गाचे दोहन करून निसर्ग चक्रामध्ये असंतुलन निर्माण केले. पर्यावरणाचे संतुलन राखत मानवाला प्रत्यक्ष अप्रत्यक्ष उपयोगी पडणार्या सजीवांच्या अनेक जाती मानव नष्ट करत आहे. क्षणोक्षणी दिसणार्या विविध पक्षी व प्राण्यांच्या जाती पाहण्यासाठी आज प्राणी संग्रहालयात जाऊन पाहावे लागते. चिमण्या, गिधाडं, कावळे, माळढोक, कौंच, साप, माकड, वाघ, चित्ता असे विविध प्राणी अस्तित्वाची लढाई लढत आहेत.

वरील नष्ट झालेल्या सजीवांच्या जातींची आकडेवारी लक्षात घेतल्यास असे लक्षात येते कि, पर्यावरणातील असमतोलाने एके दिवसी सृष्टीवरील मानवजातहि नष्ट होण्यास वेळ लागणार नाही.

हल्ली बदलत्या काळात मानवांच्या राहणीमानात ही मोठा बदल झाला आहे, पुर्वी घरांच्या शेजारी डौलदार वृक्षांची छाया पसरलेली आसायची, तो पर्यावरणाचा सौदर्य व वातावरण काही वेगळाच असे, काळ बदलला आणि आणि घराशेजारील डौलदार वृक्षांची कत्तल झाली, आणी आज मात्र काँक्रीटच्या जंगलात कुठेतरी कुंडीत छोट्या-छोट्या शोभेची रोपही पहायला मिळत आहेत, दिवसेंदिवस वृक्षांची कत्तल होत चालली आहे, जंगले सपाट होत चालली आहेत, या सर्व बाबींना कारणीभूत हा मानव जात आहे, याचा दुष्परिणाम पर्यावरणावर झाला आहे, आज ग्लोबल वा ॅर्मींग सारख्या गंभीर समस्याना तोंड देत आहोत, हे कुठला दैवी कोप नाही तर मानवी जीवनातले बदलते जिवनशैलीचे कारण आहे. माणव जातीने केलेल्या पर्यावरणाच्या र्हासामुळे अवकाळी पाऊस, गारपीठ, दुष्काळ अश्या समस्या भेडसावत आहेत, निसर्गाच समतोल जर असच ढसळत राहील तर सजिवसृष्टीस हणीकार ठरू शकते, निसर्गाच्या सौदर्यास आपल्याच हाताने वृक्षतोड करून, पर्यावरणाच र्हास करून ग्लोबल वा ॅर्मींग सारख्या समस्यांना खेचत आहोत.

मित्रांनो निसर्ग कधिच बदलत नसते, ती बदलते मानवांची जिवनशैली, त्याचा परिणाम आज आपण भोगत आहोत, निसर्गाच्या समतोलनात बदल याच कारण आज मानव सृष्टी ठरली आहे.

यासाठी प्रत्येक व्यक्तीनी पर्यावरणाच्या स्वरक्षणासाठी पुढाकार घेतला पाहीजे, बदलत्या वातावरणाला आवर घालण्याची गरज आहे, आजच्या युगात वृक्षांची लागवड करणे अती गरजेचे आहे, प्रत्येक व्यक्तीनी एक-एक झाड लावण्याची शपय घेतली पाहीजे, झाडे लावूनही चालणार नाही तर त्याच संगोपन करणे महत्वाचे आहे, काही शास्त्रज्ञांचा दावा आहे की आपल्या राहणीमानातली जिवनशैली अशील पर्यावरणाच्या नायनाटीच्या वाटेला चालत राहीली तर काही ५०-१०० वर्षात या पृथ्वीतलावर सजिवसृष्टी जिवंत राहू शकत नाही.

जसे आपल्या राहणीमानात नवनवीन तंत्रज्ञानाचे उपक्रम वापरून आपली जिवनशैली बदलत आसतो, त्याच प्रमाणे आपल्या निसर्गाच समतोलनाचे सावरते करणे आपलं कर्तव्य आहे. म्हणजे आपण जिवनाशी समरस व्हायला हवे. आपण सामाजिक जिवनात वावरतांना चाहूबाजूंनी विचार करणे गरजेच

आहे, सुखला चटावलेले आपण, वृक्षांचीच नव्हे तर एकप्रकारचे आपल्या पुढील पिढ्यांची कत्तल करत चाललो आहोत, याची भान असने गरजेच आहे, असे भान नसल्याने पर्यावरणाच्या समतोलनात वाढ होत चालली आहे, पावसाळ्यात नद्या-नाल्या, गावो-गाव उध्दवस्थ होवोत इतका पुर येतो, आणी नंतर लगचेच नद्या -नाल्या कोरडेठाक पडतात, यामागील कारण आपली जिवनशैली. समारंभपुर्वक झाडे लावली जातात, पण जोपासना केली जात नाही, पैशाला हापापलेले वनरक्षक, वनअधिकारी, वृक्षतोडींना प्रोत्साहन देवून वनभक्षक झाले आहेत. आज वृक्ष झाडे, प्राणी, पक्षी आणी माणसेही त्यांच्या अस्तित्वापेक्षा, प्राणापेक्षाही पैशाला चौनीला अवास्तव महत्व देत आहे, परिमाणी पावसाळ्यात पुर येणे, हिवाळ्यात थंडीचा कडकडाट, उन्हाळ्यात, गरमीने शरीराचे लाहीलाही होणे हे आपल्याच करणीचे भोग.

निसर्गाच्या बदलत्या समतोलावर गांभीर्याने हा मानव समाज दखल घेने अत्यंत अवश्यक आहे, 'झाडे लावा, झाडे जगवा ', हा मुलमंत्र सर्वांनी जोपासन्याची वेळ आली आहे, हिरवीगार जंगलांची कत्तल थांबवने व वृक्षतोडीशी संबंधित भ्रष्टाचार वनअधिकार्यांस कठोर कायदे अंमलात आनने गरजेच आहे, मानव निर्मीती ही निसर्गाच्या खुशीतून झाली आहे, म्हणजेच निसर्गच आपला निर्माता आहे, हे आजपर्यंतच्या शास्त्रज्ञांच्या शंशोधनाचा दावा आहे, म्हणून आपण आहोत म्हणजे कारण निसर्ग या निसर्गाचा र्हास करून स्वतःच अस्तीत्व संपूवून घेत आहोत, याचाही या समाजाला भाण आसणे गरजेच आहे. पृथ्वीवरील सार्या सजीव सृष्टीचा आधार हे येथील पर्यावरण आहे. पृथ्वी सोडून इतर कोणत्याही ग्रहावर व विश्वात इतरत्र असे पर्यावरण नाही. त्यामुळे येथील पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन करणे मानव जातीस नव्हे तर सर्व सजीव सृष्टीस अत्यावश्यक आहे.

## ● मातृ -पितृ भव...

कोणी असेल तर ते आई – वडिल असतात. आपल्या विकासात कारणीभूत अनेक घटकांपैकी पालक हा सर्वात महत्वाचा घटक आहे. तेव्हा सर्वच पालकांनी सर्वात पहिले मनाशी खुणगाठ बांधून आपल्यावर अवलंबुन एक जीव विकसित होत होत एक मानव म्हणुन विकसित होणार आहे. या 'मानव' संज्ञेमागे खुप मोठं असं अर्थपूर्ण विश्वच आहे.

नुकतेच प्रकाशीत झालेल्या नाना पाटेकर यांच्या "नटसम्राट" या मराठी चित्रपटाला महाराष्ट्र भरातून खुप प्रसिद्ध मिळाली, नटसम्राट चित्रपटाने महाराष्ट्रातील तमाम जनतेचे डोळे पाणावले आहे, एका महाण नटाची वृध्दपणाला मीळालेला स्वतःच्या कुठूंबाचा सहारा या चित्रपटात निर्दशवले आहे.

या नटसम्राट चित्रपट पाहून खरच अगदि त्या महानटाच्या जिवणात जे काही कुठूंबातून वृध्दपणाला झालेला आत्याचार पाहता, आज वास्तवात हे जाणवत आहे. नानांच्या ओठांतून निघालेल्या प्रत्येक वाक्य आज देशातल्या प्रत्येक वृध्दांना लागू होण्यासारखी बाब आहे. स्वतः चे आईवडिलांचे वृध्दपणेला भावणा दुखवण्याच काम आज या समाजात घडतोय, आज महाराष्ट्रात वृध्दाश्रमात वृद्धांची वाढती संख्या पाहून माणसातल्या माणूसकीला काळीमा भासवत आहे.

आपल्या जन्माचे नऊ महीने आपल्यावर होणार्या नको त्या वेदना सहन करीत अखेर माणवरूपी जन्म देणारी ती माता आणी स्वतः गरीबीत जिवन जगत आपल्या प्रत्येक हट्ट पूर्ण करणारा तो बाप आज आपण विसरत चालोत, माणवरूपी जन्म घेवून एखाद्या स्थरावर पोहचण्यासाठी ज्यांनी आपल्या रक्ताच पाणी करून, सुजनशिल संस्काराने घडवणारे आई-वडीलांना त्याच सुशिक्षित पाल्यांकडून त्या माता पित्यांना वृध्दाश्रमाची वाट दाखवणारा हा समाज आज या मातीत घडतोय. कधि वेळ भेटल्यास एखाद्या वृध्दाश्रमाला भेट द्या, आणी पहा तिथे एखाद कितपत पडलेल जोडप दिसेल आणी सहज प्रश्न विचारा त्या जोडप्यांना कि "तुम्हचे मुल काय करतात" पहा उत्तर काय मिळेल, त्या वृध्दाश्रमात कितपत पडलेल्या प्रत्येक जोडप्यांच्या तोंडून एकच उत्तर मिळेल, "माझ पोरग इंजिनिअर आहे, माझ पोरग

डा ॅक्टर आहे, माझ पोरग वकिल आहे, माझ पोरग प्राध्यापक आहे ", आणी अस एकही वृद्धांच्या तोंडून उत्तर येणार नाही की, माझा पोरग "आडाणी शेतकरी" आहे. कारण आडणी शेतकर्यांचे आईवडील वृध्दाश्रमात पोहचू शकत नाहीत, मग वृध्दाश्रमात कोणाचे आईवडील पोहचतात सुशिक्षित समाजाचे, आईवडिलांच्या कष्टाने मिळवलेल्या चार आकडी पगार उचलणार्या सुशिक्षित तरूणांचे, मग आम्ही शिक्षण तरी काय घेतल हे, स्वतः च्या आईवडीलांना सांभाळण्याची ताखत तुम्हच्या मणगटात नाही तर या समाजात जन्म घेवून तरी कश्याला, त्या बिचार्या माऊलींना नकोत्या संकटात टाकायला, ?

नटसम्राट मधिल एक कुसुमाग्रज यांच वाक्य नानांनी खुप स्पष्ट शब्दात मांडल,

"सुर म्हणतो सात दे, दिवा म्हणतो वात दे, उन्हामधल्या म्हातार्याला फक्त तुझा हात दे. "

वृध्दाश्रमात पोहचलेला प्रत्येक वृद्ध आपल्या मुलांच्या विचारांने कुळमरूण जातो, कोरड्या आभाळाखाली जिवणातला शेवटचा क्षण मनातल्या वेदनेच्या कळोलांने संपवतो.

हे म्हातारपण म्हणजे बालपण आसत, आपण ज्यांच्या आपल्या बालपणी वडीलांची भुमीका सकारलेत, तेच आज त्यांच्या म्हातारपणी आपण वडीलांची भुमीका सकारावी. पण समाजात म्हातारपणी वडीलांची भुमीका साकारणारा समाज उदवस्थ झालाय, जशी दिव्याला वातीची साथ पाहीजे त्याच प्रमाणे या म्हातारपणी आपल्या मुलांकडून आसरेची साथ हवं आहे, ज्या आपल्या चिमुकल्या बोटाला पकडून आसरेची साथ देत आपल्या पायावर उभा राहण्याची शिकवण त्या माऊलींनी दिली आज आपण पण त्यांच्या वृध्दपणेला आपल कर्तव्य पार पाडतोय का यावर मात्र घोर निराशा आहे. अवघ जिवन आपल्या मुलांच्या भविष्यासाठी खर्ची घालणारे आईवडीलांना वृध्द अवस्थेत शेवटचे दिवस आपल्या मुलांच्या सुखाचा संसार पाहण्याचे स्वप्न पाहणार्या आईवडीलांना वृद्धांश्रमाची वाट दाखवणारा समाज किती संकोचीत विचार धारणेची आसेल. नटसम्राट पाहून डोळयांचे पापण्या ओले केले पण, समाजाला आपल्याच कुठूंबात घडतोय हे मात्र समजत का नाही, यावर मात्र प्रश्न निर्माण होतो.

या मराठी मातीला

ज्यांच्यापासून दिवस सुरु होतो आणि ज्यांच्यापाशी संपतो ते म्हणजे आई-बाबाच जग. कधी कधी कंपने निर्माण होण्याआधी आघात व्हावा लागतो. तर डोळ्यात पाणी येण्यासाठी आधी ठेच लागावी लागते.

वियोगाची वेदनेची कळ उठण्यासाठी आईबाबांशी तितक एकरूप व्हावं लागतं ! खरं ना ?....

"कोणालातरी तुमचे अस्तित्व आधार देते.

कोणालातरी तुमचे हसू मोत्यांसारखे वाटते

कोणालातरी तुमची उपस्थिती हवीहवीशी वाटते.

तुम्ही मौल्यवान आहात स्वत:ला जपा आणि इतरांनाही"

असे सांगावयाची गरज आज पडते. आयुष्याचा प्रवास किती कठीण आहे ना !

देव मरु देत नाही आणि मुले मोकळेपणाने जगू देत नाही. अशी दुरवस्था आपल्या वृद्ध आई-वडिलांची या पिढीने केली आहे. जसं वय वाढत जातं आणि आयुष्य सरत जातं अशावेळी त्यांची मने हळवी होत जातात.

वृद्धाश्रमात कितपत पडलेल प्रत्येक जोडप आपल्या जिवणाची दश्या जगासमोर मांडतोय,

"सगळ्यांनी साथ सोडली

आम्ही पडलो एकटे

## ● कुठूंबापासून दुरवलेल्या वृद्धांची दिवाळी

आज प्रत्येक आईवडील आपल्या मुलांमध्ये आपल जग बघतात, आपल म्हातारपणी माझा पोरग मला आनंदाने सांभाळेल आसे म्हणत आज जो मायेचा हात मुलांच्या डोक्यावरून फिरवतोय, त्या हाताचे उपकार आजच्या तरूणांना समजतो का आसा प्रश्न निर्माण होतोय, आपण ज्या स्थरावर पोहचलोय त्या साठी घेतलेले आईवडीलांच्या कष्टांचे लक्त रस्त्यावर टांगतोय.

आपले पहीले इश्वर म्हणजेच आईवडील यांना विसरून चालनार नाही, ज्या प्रमाणे तुम्ही दगडाची मुर्तीत देव शोधता, तरी देव सापडत नाही मीत्रांनो देव तर आईवडीलांच्या सेवेत आहे, देव यांच्या वृध्दापणी दिलेल्या सुख समाधानीत आहे, "आईवडीलांची सेवा हिच इश्वर सेवा आहे".

माणवी जिवन आपण जगत आसतांना एखाद्या भावनात्मक गोष्टी ह्रदयी स्पर्षीने आपणांस हदरून सोडतात, बालपणा पासून ते वृध्दांपर्यंतचा प्रवास म्हणजे सुखा पासून ते दुःखा पर्यंतचा प्रवास आपण करत आसतो, ज्यांच्या बोटाला पकडून आपण पायवर उभा राहणे शिकलोत आज त्यांनाच

लाथाडत चाललेल्या समाजाकडे पाहता खरच कठेतरी चूकतंय हे सांगणेच चुकिचे ठरतोय. उतरत्या वयात कुटुंबापासून दुरावलेल्या आपुलकीची ऊब अनुभवू न शकणार्या वृद्धांच्या यातना हेलावून जातात.

खुप दिवसांनी दिवाळीला गावाकडे निघालो, ते गावचे वातावरण अगदी प्रसन्नमय, निसर्गरम्य परिसर, ति खोप्याचे घरे, अंगणात तुळस, शेनाचा सडा, आणी दारापुढे रांगोळी पाहून किती तरी दिवसांनी मनाला एकप्रकारचे प्रसंन्न लाभले, गावाच्या काठेवरून जातांनी एक वृद्ध महिला बसली होती, अंगावरती फाटक लुगड, चेहर्यावर सुरकुत्या पडलेली, हातात काठी, डोळयांना प्रकाशाच्या किरणांपासून सावरून आडवा हात कपाळी टेकून माझ्या कडे पाहत होती, मला वृद्धांची फारच किमया येते, सणाच्या दिवशी अख्खं गाव अंनदोत्सव साजरी करत आसतांना, मला तीच्या डोळयात दुःख दिसत होत, हळूच माझे पावले तिच्या घरच्या दिशेने सरकवली, तिच्या शेजारी बसून अलगत घरात डोकावून पाहीलो, घरी कोणी दिसत नव्हत, घर अगदी गावच्या काटेवर होत, एक स्मित हस्य देत आजीला एक प्रश्न विचारलो,

मी- माय घरी कोणी नाय का.. ?

वृध्द- नाय पोरा, तु कोण रे. ?, तिने माला एक प्रश्न केला, मी माझी ओळख पटवून देताच,

वृध्द - "पोरा, नागनाथाच पोर होय रे, आर तुझा बा, मयाकडे रोज यायचा लहान असतांनी", माझ्या डोक्यावरून हात फिरवत, "किती मोठा झाला पोरा", म्हणत बाजून सावरली, तिच्या डोळयात अश्रु दाटून आले होते, फाटक्या पदरांनी डोळे पुसत मधल्या घरात गेली, जनू तिला तिच्या मुलांची आठवण आली आसेल, एका लाकडी पेटीतून एक काहीतरी काडुन त्यावर हात फिरवत होती, तेव्हढ्यात मी मध्ये गेलो, पाहताच तिच्या हातात एक फोटो होती, मि तिला विचारलो,

मी- माय यो कोण ऐ. ?

वृध्द - "हे माझे पोर ह्यात, गेल्या चार वर्षी झाली, यांना फाहीलो नाय, यंदा दिवाळीसणी येतो म्हणून त्या तुक्याकडे निरोप दिला, माये पोरात खुप जिव आडलाय रे, पोरा तु शहरात रातो ना र, तुला माझे

हे पोर दिसली तर त्यासनी मी खुशाल हाय म्हणून सांगतो का रं. !, "एकदा येवूसनी जाय म्हणावं, माये पोर लय गुणाचे हायत". म्हणत ति अश्रु ढसाढसा वाहू लागली, मी माण डोकावत तिच्याकडेच पाहत राहीलो, माझ्याही काळजाची तार तुटली होती, किती सहन कराव या वृद्धेनी, पोटाला चिमटा देवून शिक्षण शिकवून, शहरात धाडले, तिकडेच लग्न करून या मातेला विसरून जाऊन तिकडे किती गुन्यागोविंदाने जिवन जगत आहेत, जन्मदात्यांसाठी वेळ नसेल का हो तुमच्याकडे. ?

थोडा वेळ तितेच बसून वृद्ध आजिच्या घरात निरीक्षण करत होतो, बांधावर दोन फाटकी लुघडे, कोपर्यात उतरंडी, एक चुल असी तिची एक छोटीसी झोपडी, त्यात ति एकटीच राहते, नराहून वाचारावेसे वाटलं,

मी - "माय तुये पोर काय करत्यात शहरात. ?"

वृद्ध- "पोरा, माय एक पोरगा मास्तर हायं, आण् दुसरा वकील हाय!"

आजीची हे उत्तर ऐकुन काळजात तार तुटावी, अभाळात विच कडाडावी तशी अवस्था माझी झाली होती, या उत्तराने डोळे मात्र ओले केले, उभा असलेला मी तितेच झोपडीत खाली टेकलो, जेमतेम चक्क 15 मीनीट माझी बोलती बंद झाली, ज्यांनी नऊ महिने असंख्य वेदनेसी झेलत, आपणास जन्म देवून हे जग दर्शन घडविनारी ती माता, हाताच्या बोटाला पकडून स्वताः च्या पायावर उभा राहण्यास शिकवणारी ती माता, पोटाची खिनगी भरवतच पोटाला चिमटा घेवून आपल्या शिक्षणात कुठला कमतरता कमी पडू नदेणारी ती माता, ज्या मातेनी जगण्याची दिशा आपणांस दाखवली तिच माता आज जगण्याशी झुंज घेत आहे.

त्या मातेची चिंता त्या ना शिक्षक मुलाला आहे ना वकिल मुलाला, तिच जिवन ति जगते, तिच वय नाही राहील, जेमतेम नव्वदी गाठली, तिला दोन वेळची भाकर करून घेणे होत नाही, ति काठीच्या सहाय्याने चार घर मागून पोट भरवून घेते, पतिला गमावून आता एकटी पडली खोप्यात, वाट पाहत आहे मुलांच्या येण्याची, परंतु गेल्या चार-पाच वर्षांपासून मुलांनी गावाकडे फिरकले नाहीत,

नातवांसोबत गप्पा मारण्याची खुप इच्छा आहे, परंतु आजवर नातवांच चेहरा पण पाहीली नाही, शेवटी तीला एक प्रश्न केलो.

मी -"माय तुला शेत बित हाय का नाय?"

वृद्ध -"पोरा, पाच एकर शिवार होत पोराच्या शाळेसाठी समद विकल"

तिच्या काकडत्या बोलीतून बोलून निघाली परंतु तिच्या बोलण्याने माझ्या ह्रदयी चिरफाड झाल्याची भास झाली, शेतसार विकून मुलांना शेहरात शिक्षणासाठी पाठवणारी ही माता, आता स्वताःच्या पदरात एक रूपया देखील ठेवली नाही, जगणे मुश्किल जाले, सुशिक्षीत, संस्कारशील मुलांना स्वतःच्या माता पीतांची सेवा करणे होत नाही तर मग यांनी शिक्षण शिकून तर काय साद्य केले, एक तर वृद्धाश्रम किंवा गावातील झोपडीत सोडून देणे हेच का त्या शिक्षक आणी वकिल मुलांच शिक्षण.

वृध्दपणा म्हणजे दुसर बालपण आसत, त्यांनी आपल्या बालपणी आपल्याला सांभाळले आणी आपण त्यांच्या वृद्धपनी त्यांना सांभाळले पाहिजे हे कर्तव्य आहेच देखील त्यांनी अनंदी ठेवणे ही आपली जबाबदारी आहे.

सगळ्यांनी साथ सोडली,

आम्ही पडलो एकटे,

भाग्य पहा आमचे,

आजही आम्ही फाटके.

हिच शोकांतिका आज प्रत्येक वृद्ध अवस्थेतील वृद्धाची बोल आहेत,

मित्रांनो प्रसन्न वाटनारी ती गावकडचे वातावरण या मातेच्या जानून घेतलेल्या दुःख ने, माझ्या नजरेत सर्वत्र दुखवटा पसरवा होता, जनू देशात कितीतरी असे वृद्ध आपल्या मलांपासून वंचित असतील, आजची दिवाळी ही या वृद्धांची कसी असेल, विचार करण्याची बाब आहे.

## ● आधुनिक दुनियेचा, मावळता पत्रव्यवहार... !

मित्रांनो, आपण आज २१ व्या शतकात या जीवनाची ताडजोत व आपल्या अस्तित्वासाठी लढाई व जगण्यासाठी संघर्ष करत आहोत, सव्वाशे कोटींचा देश ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या 'मिशन-२०२०' कडे वाटचाल करत आहे, त्यात आपणही मोठा सहभाग नोंदवला आहे, आणि या डिजिटल दुनियेत आपण खूप काही प्राचीन पद्धती विसरून गेलो आहोत.

त्यातलाच एक म्हणजे पत्र, आजच्या नवयुवकांना जर आपण एक प्रश्न विचारला कि, पत्र काय असत?, तर त्याच उत्तर असेल, मेल्स, फॅक्स, संदेश पाठवे, वैगेरे यांच उत्तर अगदी बरोबर असत पण आपण जे पत्र पाहिलेले असते, ते पत्र व्यवहार आज पूर्णतः लुप्त झालेली आहे, या रोबोटिक्स च्या दुनियेत वेळेची बचत व जलद संदेश आणि दळणवळणा ची नवेनवे साधने अस्तित्वात आले आहेत, "आईचे पत्र हरवले", म्हणायला आत्ता तो लहानस बाळ जोकी शाळेतुन पत्रव्यवहार करणारा राहिला नाही, तोच बाळ आज आपल्या आई ला मम्मी म्हणून नव्या विश्वाची व आधुनिक दुनियेची फुंकार फुकत आहे, पत्रव्यवहार ऐवजी मेल्स, फॅक्स चा अतिवापर करताना दिसत आहे, आणि आईचे पत्र हरवलं म्हणणारा तो बाळ आणि ते पत्रं आज अस्तित्वहीन झाला आहे. मानवांचे मूलभूत गरजा आपल्याला माहितच असतील, "अन्न, वस्त्र, निवारा", आपण शिकलेले हे तीन मूलभूत गरजा, आत्ता त्यात बदल झाला आहे, अन्न, वस्त्र, निवारा बरोबरच मोबाइल हा एक मूलभूत गरज आजच्या आधुनिक दुनियेत झालेला हा मोलाचा बदल आहे.

पूर्वी मोबाइल व इंटरनेट अस्तित्वात नव्हतं, तर तेव्हा पत्रव्यवहार चालत असे, छत्रपती शिवाजी महाराजांच्या १७ व्या शतकात देखील पत्र व्यवहार हा एक प्रमुख साधन असे, त्यावेळी दळनंवळणासाठी घोडे, हुंटांचा वापर करत असत, त्याच बरोबर पत्र व्यवहार हि घोड्यांच्या सहयाने केले जात, त्यामुळे पत्र पोहचण्यास फार वेळ लागत, नंतर काही कालांतराने त्यात थोडा बदल झाला,

नवे साधनांची शोध व नवे संकल्पना जोपासून पत्र कबुतरांच्या सहाय्याने हा मानव पत्र व्यवहार करू लागला, काळानुरूप बदल व नवे संशोधनातून एकएक पाऊल डिजिटल कडे पडत राहिला, इ. स. १८७६ साली अलेक्सझेंडर नावाच्या शास्त्रज्ञाने टेलिफोनचा शोध लावला, त्याने क्षणात संपर्क होऊ लागला, हा शोध म्हणजे जगाला एक आचर्यचकित वाटणारा ठरला, टेलिफोन च्या शोधणे हळूहळू हा टेलीफोनचा प्रसार होत गेला आणि आपल्या भारतात २०व्या शतकात कुठे तरी जिल्हा व तालुख्याच्या ठिकाणी टेलीफोन बूथ उभारले गेले, तरी पत्र व्यवहारास काही फरक पडला नाही, स्वातंत्रच्या चळवळीत देखील पत्र व्यवहारच जास्त प्रमाणात चालत असे, पुढे चालून रेडिओ सारखे वृत्त व मनोरंजासाठी आधुनिक शोध ठरला, आणि या रेडिओ च्या माध्यमातून गावागावात वृत्त पोहचणे सोपे झाले, कुठे काय घडतेय, देशात काय होतोय या सर्व बाबी रेडिओच्या माध्यमाने दुर्गम भागापर्यंत बातमी पोहचत होती, पूर्वी आनंदाची असो व दुःखाची बातमी आपल्या पर्यंत पोहचण्यास कमीतकमी चार ते पाच दिवस लागत असे, कारण आज जो अपल्याकडे उपलब्द असलेले साधन पूर्वी अस्तित्वात नव्हते, कालांतराने हा वेळेची व श्रमेची बचत करून, आधुनिक साधनांचा शोध लागला, आपण एक दहा वर्षे मागे पहिला तर तेव्हा ही पत्र व्यवहार चालत असे, एक दहा वर्षाखाली कुठेतरी गावात एखादी STD टेलिफोन बूथ असत, मात्र तो येणारा बिल परवडत नसे म्हणून शक्यतोर पत्र पाठवणे हाच सोपा मार्ग वाटत, मीही अनेक वेळा पत्र व्यवहार केलो आणि करत आहे, पत्र पाठवण्याची ती मौज वेगळीच असते, ५० पैशाच्या पत्रावर छानशा अक्षरांनी लिहिलेली ती ओळी आणि पत्राच्या डाव्या बाजूला लिहलेला पत्ता आजही आठवणीत आहे, टपालवाहक शाळेच्या बाहेर येऊन, पोस्ट म्हणून मारलेली हाक व धावून त्यांना माझ्या नावाचं आहे का हे विचारलेली बोल आजही ते हृदयात खोलवर रुजले आहेत, मात्र आत्ता आई ची मम्मी व बाबांचा डॅड झाला आणि संपर्कासाठी हातात स्मार्टफोनच आलं, क्षणात समर्क साधू शकतो अशी नवी नवी यंत्रने आज आपल्याकडे उपलब्द झाली आहेत, या तंत्रक्षेत्रात आपल्याला पाहायला मिळत आहेत, जुन्या आठवणी ते केवळ आठवणीच राहिल्या. अश्या आधुनिक वाटचाळीतून पुढे चालून यात आमूलाग्र बदल घडून आला आणि आत्ता, २१ व्या शतकात देश महासत्तेच्या दिशेने झेप घेत चालला आहे, हाती स्मार्ट फोन घेऊन इंटरनेटच्या साहाय्याने जगातल्या घडामोडी काही क्षणात जाणवू लागलो, आत्ता पत्राची जागा मेल्स, फॅक्स ने घेतली, सुख दुःखाचे

बातमी काही क्षणात आपल्या पर्यंत पोहचू लागले, आणि हाच मानव आज नातलग, गणगोत, हि मनोवृत्ती देखील याच स्मार्टफोनच्या माध्यमातून जोडू लागले, मानवी जीवनात झालेल्या अश्या आमूलाग्र बदलात आज आपण पूर्वी वापरल्या जाणाऱ्या पत्र व्यवहाराचा पूर्णतः विसर पाडत गेलोत.

ती पत्र व त्यावर लिहलेली ती छानसं अक्षर आज पाहायला देखील मिळत नाही, कुठेतरी तो लुप्त झाला आहे, या रोबोटीकसच्या दुनियेत त्या पत्राचा विसर पडला आहे, संदेसे अति है, म्हनणारे ते बोल आज ऐकायला आणि म्हणायला बरे वाटते, परंतु त्या काळी सीमेवरील जवानांचा तो पत्रासाठी आतुरतेने पाहिलेली वाट व त्यांच्या डोळ्यातील भावना आजही हृदयाला खेचतात, ते मित्रांना पाठवलेले पत्र व मित्रांना भेटण्याची आतुरतेने उन्हाळ्याच्या सुट्यांची वाट पाहणारे आम्ही आज हातात मोबाईल घेऊन हाय, हॅलो म्हणून बोलताना दिसत आहोत, ती भेटण्याची ओढ राहिली नाही, ती मित्रांचा गोडवा राहिला नाही, आजच्या या डिजिटल दुनियेत आम्ही डिजिटल झालोत खरे पण, आमच्या आठवणी मात्र डिजिटल होण्यास नकार देत आहेत.... !

## ● स्मार्टफोन, जिंदगी है मेरी...

माणुसकी, गणगोत, आपुलकी, प्रेम, भावना, यातना हे मानवी जीवनाचे संवेदनशील तेचे सामग्री, यातून या मानवाला आपलं कुटुंब, आपली पाहून, आपली मानस, ही भावना निर्माण होते आणि याच भावनेतून जगण्याचे सामर्थ्य मिळते. मानवी जीवनात कालांतराने अनेक बदल घडत आलेत. दूरवर असणारे नातलग जवळ करण्यासाठी व त्यांच्याशी जलद संपर्क करण्यासाठी अत्ता स्मार्टफोन सारखे साधनांचा जन्म झाला, आणि हा मानव स्वतःचा विकास करत करत आपल्यात असलेल्या मानवता या धर्माला ही विकसित करण्याचा प्रयत्नशील ठरला, आणि स्वतः बरोबरच माणुसकीलाही डिसीटल च्या युगाशी जोडले, आणि आपल्यात असलेल्या माणुसकीला थोडा संगणकीय दिशा दिली. कधी आपसात बोलणे, मित्रांचा कट्टा, कुटुंबातील सर्व सदस्य एकत्रित येऊन साजरे होणारे सण हे सर्व लोपापवली आणि इथे निर्माण झाला तो स्मार्टफोन चा युग.. म्हणून हा माणुसकीचा काळयुगी टप्पा म्हणजे स्मार्टफोन जिंदगी है मेरी...

सध्या बाजारातील सर्वात पसंतीचे तंत्रउपकरण कोणते असेल तर ते स्मार्टफोन आहे. स्मार्टफोन हा फोन, संगणक, कॅमेरा, म्युझिक प्लेअर अशा अनेक उपकरणांचे अनोखे मिश्रण आहे. एकाच वेळी अनेक कामे करू शकतो म्हणून त्याला 'स्मार्ट फोन' असे म्हणतात. स्मार्टफोन म्हणजे मानवी जीवनाचा अविभाज्य घटक झाला आहे. आधुनिक युगात वाढत्या स्मार्टफोन च्या वापरामुळे मानवी शरीराला धोका ठरतोय अस अवहाल आय. आय. टी मुंबई च्या इलकंट्रोनिक शाखेच्या प्रा. गिरीष कुमार यांनी केंद्र शासनाकडे सादर केला.

तंत्रज्ञानाच्या या धावत्या युगात मानवांच्या मानसिकतेचा भार या स्मार्टफोनने कमी केलं अस म्हणने काही वावग ठरणार नाही. सकाळी उठल्या पासून ते रात्री झोपण्यापर्यंत या स्मार्टफोन शिवाय एक

क्षणही या मानवी जीवाला विश्रांती मिळत नाही. पूर्वी तंत्रज्ञान एवढं विकसित नव्हतं, शासकीय व कार्यालयीन कामे सर्व दस्तऐवज कागदोपत्री पध्द्तीने चालत असे. एकमेकांना सम्पर्क साधण्याचे साधन ही पत्रव्यवहार होत. नातेवाईकांना गाठीभेटी ही प्रत्येक्षात असत. मित्रा मंडळींची कट्टा म्हणजे मनमोकळया गप्पा रंगत. एकमेकांना प्रत्येक्षांत भेटून आपल्या अडचणी एकमेकांना सांगण्याचा योग असत. मात्र वाढत्या तंत्रज्ञानाणे प्रत्येक मानवांच्या घरात एक टेलिफोन आलं, याने दूरवर क्षणात संपर्क साधू लागलो. प्रत्येकाच्या वेळेत बचत झाली.

कालांतराने प्रत्येकाच्या हातात मोबाईल आला. आणि एकमेकांना संपर्काचे कामे व्ययक्तीक झाले, क्षणात जगभरात संपर्क करू लागलोत. मात्र मानवी जीवनात मोबाईल म्हणजे एक मुख्य साधन म्हणून वापरात आलं, आणि मोबाईल आणि मानव अस अनोखा समीकरण निर्माण झालं.

स्मार्टफोन हा आपल्या जीवनात आल्यापासून अनेक कामे सोपे झाले. घरबसल्या जग पाहू लागलो, मोबाईल बँकिंग सारख्या सुविधांने बँकेतील फेऱ्या वाचवल्या, विद्युतबील, मोबाईलबिल, दूरदर्शन बिल, असे अनेक बिल देखील स्मार्टफोनच्या माध्यमातून भरल्या जात असल्याने अनेकांच्या कार्यालयीन फेऱ्या वाचल्या. जगातली कुठल्याही गोष्टी गूगलच्या माध्यमातून क्षणात मिळवू लागलोत. अश्या अनेक उपयोगकारक गोष्टीचा वापर मानवी जीवनात येत राहिल्या. या कारणांनी मोबाईलचा अतिवापर होत राहिला आणि आपण मोबाईलला घट्ट चिपकवल्या गेलोत. आणि परिस्थिती अशी निर्माण झाली. दिवसरात्र मोबाईल मध्येच आम्ही गुरफटून बसलोत. मोबाइलच्या अतिवापरामुळे होणारे आजार, मेंदूचा असेल व डोळयांचा हे फार पूर्वी पासून ऐकत आलोत मात्र मोबाईलच्या वापरतात काही कमतरता दिसली नाही. मोबाईल आपल्या पासून दूर ठेवल्यास जीव बेचैन होतो, काही वेळ घरात मोबाईल सापडत नसेल तर जीव गुदमरून जातो. अशी भयावह परिस्थिती अत्ता निर्माण झाली. तज्ञांच्या मते मोबाईलचा दिवसातून केवक २० मिनिटे वापरावेत मात्र हे अत्ता शक्य दिसत नाही. दिवसभर जरी कुठल्या कामात व्यस्थ असणारा व्यक्ती देखील दिवसातून १ ते २ तास हा मोबाईल मध्ये असतोच. मात्र मोबाईलच्या अति वापरामुळे मानवी जीवनाला धोकादायक ठरले आहे. विशेषतः तरुणांना

सर्वाधिक धोका असल्याचे प्रा. गिरीश कुमार यांच्या अवहालात दिसते. स्मार्टफोन मधून बाहेर पडणाऱ्या फ्री रेडीकल्स मुळे मानवी शरीरावर विपरीत परिणाम होतो, विशेषतः पुरुषांच्या जननक्षमतेवर परिणाम होतो. असे त्यांच्या संशोधातून स्पष्ट होते.

प्रा. गिरीष कुमार यांच्या अवहालावरून लहान मुलांची कवटी नाजूक असल्यामुळे स्मार्टफोन चा परिणाम वेगाने होते. सध्य स्थिती पाहता देशात लहान मुलांच्या नाजूक वयात पालकांनी त्यांच्या हातात स्मार्टफोन देऊन खूप मोठ्या प्रमाणात चूक करत असल्याचे दिसते. रडतांना, जेवनकरतांना, हातात स्मार्टफोन देऊन त्यांच्या मानसिकतेवर परिणामकारक घातक असलेलं मोबाइल त्यांना देत असतो. मोबाइलच्या अधीन होणाऱ्या लहान मुलांमध्येही वेगवेगळे मुद्दे दिसून येतात. त्यातही विविध वयोगटांतील लक्षणं, वागणं वेगवेगळं असतं. त्यांचं वय, मानसिकता, विचार करण्याची पद्धत या घटकांवरून त्यांचं मोबाइलशी असलेलं नातं वेगवेगळं असतं. काही दिवसाखली हरियाणा येथील एका चौथीत शिकणारा मुलगा त्या मुलाकडून पालकांनी मोबाईल हिसकावून घेतल्यामुळे तो मुलगा हाताच्या नसा कापून आत्महत्येचा प्रयत्न केल्याची घटना फार चिंताजनक आहे. एक क्षुल्लक कारणावरुन चौथीत शिकणाऱ्या १० ते १२ वर्ष्याच्या मुलाने एवढ्या टोकाचा निर्णय घेताला कसे. ? हे मोबाईल चा त्यांच्यावर झालेला आकर्षितता आहे. अनेक तज्ञांच्या म्हणण्यानुसार लहानग्या वयात सतत मोबाईल हाताळत राहिल्यास तो त्या साधनाकडे आकर्षित होतो, त्यातील फोटोस, विडिओ, संगीत व मुख्य म्हणजे गेम्स त्यांना आकर्षित करतात, या मुळे त्यांच्या मानसिकतेवर परिणाम होऊन झोपेचे आजार होतात. झोपेत देखील मोबाईल वाजल्याचा भास होत असतो. सहा वर्षांने हे आजार अजून वाढत जातो व त्याचा परिणाम त्यांच्या पुढील शिक्षणावर व समाजात वावरत असतांना संवाद क्षमतेतलं वेग मंदावत जातो. एकांतपणाचे लक्षणे हे त्यात निर्माण होतात. त्याचा परिणाम अभ्यासावर देखील दिसून येते. अनेक वेळा पालक आपल्या पाल्यांना हट्ट पनापासून दूर करण्यासाठी, त्याला शांत करण्यासाठी हातात मोबाईल देतात मात्र हे एका प्रकारच्या धोक्यालाच आमंत्रण देत असतात हे विसरून चालणार नाही.

माणसाच्या आयुष्यातल्या काही गोष्टी सोयीच्या व्हाव्यात यासाठी तंत्रज्ञान विकसित होत गेलं आहे. त्यात नवनवीन शोध, प्रयोग होत ते आता प्रत्येकाच्या आयुष्याचा भाग बनलं आहे. तंत्रज्ञानाने माणसाचं

आयुष्य सोपं केलं. पण त्याचा अतिवापर, अतिरेक माणूस करत असेल तर तो तंत्रज्ञानाचा दोष नाही. मोबाईलचा अतिवापर हे सध्या वेगाने वाढत जात आहे. काही कंपन्या रात्रीला वापरल्या जाणाऱ्या इंटरनेटवर ५० टक्के सूट देत दिवस रात्र स्मार्टफोन वापरात वाढ होत आहेत. जिओ सारख्या कंपन्या स्वस्त दरात सेवा सुरू करून अनेकांना मोबाईलला बांधून घेतले आहेत. लहानग्या पासून थोरापार्यंत मोबाईल म्हणजे हाताच्या बेड्या सारखी गत झाली. शेवटी स्मार्टफोन आपल्यासाठी आहे, आपण त्यांच्या साठी नाही हे विसरून चालणार नाही...

## ● मानवी जिवनांचे अनमोल विचार....

जिवन खुप सुंदर आहे, त्याला सुदंर बनवणे आपल्या हातात आहे, जसे कुंभार मडकी घडवतो तसे आपण आपल्या पालकांकडून, गुरूजनांकडून घडत आसतो, ति घडण्याची वय ही ठरावीक आहे, जे काम त्याच वेळेत पूर्ण केल तरच तो मनुष्य आयुष्यात खुप पुढे जातो, यश संपादन करणे म्हणजे नेमक काय? तर, स्वतःला कर्मात झोकावून घेण, मग कर्म कोणते?, एखाद्या विशिष्ट संदर्भ घेवून आपण यशाकडे पाऊलवाट करत आसतो, या प्रवासात नक्कीच आपणांस कठीण व कठोर अडथळयांना सामोरे जावे लागते, या येणार्या अडथळयांवर मात करणे म्हणजेच कर्म.

मित्रांनो भारत देश हा तारूण्यांने भरलेला देश आहे, या देशांत तरुणांची संख्या अधिक आहे, तर आपल्या देशाला व आपल्या संस्कृतीला आणी आपल्या अस्तित्वाला जर ठिकवायच आसेल तर सर्व प्रथम या तारूण्य वयोगटातून करणार्या प्रवासाकडे लक्षपूर्वक दुष्टीक्षेप करावा लागतो, तारूण्य म्हणजे यशाचे दोन मार्ग, याच वयात आपल्या जिवनाची जिवनशैली बदलते, आपल्या आवडी निवडीकडून आपल ध्येय आपल्या समोर असते, मित्र परिवारांचा संगत याच वयात वाढीस येते, या संगतीनेच माणूस घडतो, संत तुकाराम म्हणतात,

"द्राक्षाचा वेल लिंबावरी गेला,

कडू कावूळ झाला संगती गुणे.. !"

रसाळ गोड आसलेला द्राक्ष जरी लिंबाच्या सहवासात आल्यास द्राक्षास कडू पाडण्याची ताखत त्या लिंबा मध्ये आहे, म्हणूनच संगतीचा महत्व आपल्या राहणीमाणात जास्तिचा आहे, म्हणूनच मित्रांनो

या वयात आपणांस चांगल्या मार्गदर्शनाची व मार्गदर्शकांची गरज आहे, याच तारूण्यात अनमोल विचारांची गोडी लावणार्या मित्र परिवरांची गरज आहे, परंतु आज आपण पाहतो आहोत, मित्र परिवारांच्या संगतीत हा तारूण्य व्यसनाधिनतेला कवटाळत आहे, व्यसन हा आपल्या जिवनातल्या ताण तणावांचा एक मुलमंत्र बनला आहे, तसेच संगतीचे फळ आपणांस चाखायला मिळत आहेत.

मित्रांनो हे वयच आडनिड असल्याने या वयात आपणांस अनेक मार्ग दिसतात, एखादी चमकणारी चकाकणारी वस्तू दिसते, तो उचलण्याचा, त्याला संपादन करण्याचा प्रयत्न करतो, परंतु तो काच आसतो, हाताला जखम करून सोडते व त्या जखमेपासून नानाप्रकारच्या रोगांना अमत्रित करतो, व कधि आपल अयुष्य उध्वस्त होते हेच समजेनासे नाही, तारूण्यात सर्वात जलद अकर्शीत होणारी गोष्ट म्हणजे प्रेम, मित्रांनो प्रेम नक्कीच करावे, आवडी निवडीचा भाग वेगळा, प्रेम करतो म्हणजे नेमक काय?, तर आपल्या अयुष्याची साथीदार आपण निवडत आसतो, हे खर प्रेम, हल्ली प्रेम हे एकप्रकारची टाईमपास झाला आहे, प्रेमाची व्याख्या म्हणजेच टाईमपास हि एक मनोवृत्ती या समाजात पसरली आहे, आणी हाच तो टाईमपास आपल्या जिवनात सर्वात मोठा धोका पत्करण्यास भाग पाडतो आहे, मित्र परिवारांच्या संगतीमुळे अनेक वाईट परिणाम आपल्यावर होत आसतात, एखादा व्यक्ती ही प्रेमा सारख्या वा अन्य कुठल्या तणावांनी व्यसनाधीनतेचा मार्ग स्विकारतो, तो स्विकार स्वताःपासून नसून कुठल्यातरी संगतीचा परिणाम आसतो, संत कबिर म्हणायचे,

"संगत करे बडे की तो,

बडत बडत बड जाऐ,

संगत करे गद्धेकी तो,

दो दो लाथा खा जाऐ.

संगत जर संजन्नांची, मोठ्या व्यक्तीमत्वांची व मोठया विचारांची केली तर, आपल्याही विचारधारेत, व्यक्तीमत्वात बदल होतो, कबिर म्हणतात मोठ्या व्यक्तींची संगत केल्यास मोठे व्हाल, गाढवांची संगत केल्यास दोनदोन लाथा खाल, म्हणूनच म्हणतात, "दुर्जन मंठळीत बसण्यापेक्षा, संजन्न मंडळीत बसणे बरे".

तरुणांच्या हातात देश्याचे भवितव्य आहे, हाच तो तरूण उद्याचा देश घडवणारी व्यक्तीमत्व, या तरूणांना भगतसिंहांचे नेतृत्व पाहीजे, या तरूणांना महापुरूषांच्या विचारांची गरज आहे, देश प्रेमेची गरज आहे, हा तरूण हल्ली अन्य क्षेत्रात, "दांडा आमचा, झेंडा तुम्हचा "म्हणत राजकीय नेत्यांच्या चपला संबाळत निघाले आहेत, नेत्यांच्या नामघोषीत करत, त्यांच्या सावलीत कुत्र्यांच जिवन जगत आहेत, मित्रांनो राजकारणात नक्कीच प्रवेश करा ते आपल्या हक्काच व्यासपीठ आहे, प्रत्येक युवकांनी आज राजकारणांत उतरणे गरजेचं आहे, परंतु विचार करा एखाद्या मोठया झाडाखाली छोटे झाड वाढत नाहित, त्याकरीता स्वभळावर, आपल अस्तित्व निर्माण करण्यासाठी नवे बिजे पेरण्याची उपक्रम हाती घेण्याची गरज आहे.

वैतरीक्त खुप काही जिवनात सुखकर गोष्टी आहेत, ते आपणांस अनुभवायच आहे, हे हिरवी शाल पत्करून सौंदर्याची खाण साजूनी, सुजवूनी आपणांस हस्तक्षेप करतोय, त्या सौदर्यांच्या खाणीत आपल जिवन अनंदिमय करायच आहे, जिवनात अनमोल विचारांना अमत्रिती करून, दुर्जन गोष्टींचा नाश करा, कोणाची निंदा करण्याऐवजी, मदतीचा हात समोर करा, या निसर्गाने आपल्याला दोन हाते दिलेत, त्यात मावेल तेव्हढेच घ्यायच, खाली पाडून माती होण्या अधी ते इतरांना वाटा, बघा त्यात काय सुख असते, महाविर गौतम बौद्ध म्हणतात, अहिंसेला हिंसक प्रवृतीने मारण्यापेक्षा, शांततेने वार करा तिथे यश नक्कीच आपल आहे, कुठल्याही कारणांच्या, युद्धांच्या समस्येला, युद्ध हे कोणत्याही समस्येच समाधान नाही, तर युद्धांनी दुसर्या युद्धांची बिजे पेरली जातात, म्हणून मानवी जिवनात असंख्य संकट येत आसतात त्या संकटांना शांततेने सोडवले तरच ते प्रश्न सुटतात, आजच्या तरूण पिढ्यांना या विचारांची गरज आहे, स्वतःच्या हातावरील नागमोडी रेषांवर किंवा कपाळावर आपल भाग्य कोरलेले नसते तर

त्या आपल्या हाताने केलेल्या कर्मावार व कपाळी आलेल्या कष्टाच्या घामावर आपल भविष्य उमठून दिसते, कवयित्री बहिनाबाई चौधरी आपल्या ओळीत मांडते,

नको नको रं जोतिष्या,

माझा हात नको पाहू,

माझ दैव मला कळे,

माझ्या दारी नको येवू.

माझ्या हातवर माझ दैव नसून माझ्या कष्टावर माझ्या जिवनातल फळ मला चाखायला मिळणार आहे, म्हणून मित्रांनो जिवन खुप सुंदर आहे, त्यास सुंदर बनवणे आपल्या हातात आहे; ते कुठल्या हाताच्या रेषेवर नाही, साहित्यरत्न आण्णा भाऊ साठेंनीही सांगून गेले, पृथ्वी ही कुठल्याच शेषनागाच्या मस्तकावरती तरलेली नसून कष्टकर्यांच्या तळहातवर उभी आहे, म्हणून मित्रांनो जिवनात असंख्य वाईट गोष्टी येत आसतात त्यास त्याग करत, पुढे सरसावणे म्हणजेच आपल्या अस्तित्वाची लढाई आहे.

## ● पाऊलवाट शेवटी ऐकट्याचीच... !

पृथ्वी, अवकाश, सुर्य, चंद्र, तारे, ग्रह हे अवकाशातल्या घटकांच्या निर्मीती बरोबरच पृथ्वी तलावावर निसर्गाच्या खाणीतून सजिवसृष्टीची निर्मीती झाली, त्यात मानव नावाचा प्राणी उदयास आला, आणी आज तोच माणव, माणूस म्हणून नव्हे तर, एक विशिष्ट जाती-धर्माला घेवून समाजात वावरत आहे. किती विचार करण्या जनक बाब आहे, जन्म होताच, ना त्याला जात आसते, ना त्याला धर्म, ना त्याला नाव आसते, तो एक माणूस आसतो, अगदी तसेच सर्व धर्मात मानवांचा जन्म सारखाच होतो, हिंदूंच भगवा रक्त, मुस्लिमांच हिरवा, क्रिश्चनच पांढरा, बौद्धांचा निळा असे तर होत नाही ना, आपला जन्म कोणत्या धर्मात झाला, कोणत्या जातीत झाला हे आपणांस दिसते, परंतु मानव जात, मानवी धर्म, हे का नाही समजत आपनास, जात-धर्म अस्तित्वात येण्या आधी आदिमानव म्हणून मानवि जिवन जगणारे मानव होतेच ना, तेव्हा कुठला धर्म नव्हता, ना जात, जाती धर्मा पेक्षा आज घडीला मानुसकी धर्म महत्वाचा आहे.

माणव हा येतांनी रिकाम्या हातांणी येतो, आणि शेवटी त्याच आलेल्या रिकाम्या हातांनी परततो, मग हा माणव जिवनभर केलेल संघर्ष, कष्ट, स्वार्थपणा, अस्थीसाठी, अस्तित्वासाठी केलेला लढा, पैश्यांपुढे स्वतःच्या भावांना दोषी ठरवणारा हा माणव शेवटी कणवून कमवून, जिवनभर वनवन मरमर करून काय साद्य करतो? ताज उदाहरण आपण ऐकलेच आसणार, जागतीक स्थरावरील अति श्रीमंत, करोडपती आसलेला "बिलग्रेट्स" त्यांनी कमवलेल संपूर्ण संपत्ती गोर गरीबांना, अनाथांना दाण करायच ठरवले आहे, स्वतःच्या पोरांच भविष्य त्यांनी स्वतः घडवाव हि त्यांनी घेतलेला निर्णय, हि आपल्यासाठी योग्य वाटते, अपूलकीची वाटते, सामाजिक बांधिलकी जपतोय, याची आपणांस जाणीव होतोय, अश्या मानवांसाठी आपले दोन्ही हात ऐकमेकांवर आदळू लागतात, परंतु एकवेळ त्यांच्या जागी जर आपण असलो आसतो तर काय परिस्थिती... ? पोटच्या पोरांना रिकमा ठेवणार का तुम्ही. ?, अलिषाण बंगले सोडून, झोपडीत राहणे पसंद कराल का तुम्ही ? तर याच उत्तर आहे, नाही.. ! होय प्रत्येकाच उत्तर

नाहीच असणार.. ! कारण, आपलं विचार करण्याची क्षमता, दाण धर्म नावाची गोष्ट आपणांस नव्वद टक्के समाजात नापसंती दर्शवते, प्रत्येकांची विचारसरणी वेगवेगळी असते.

आपण जन्माला आलोत, तर नेमके कश्यासाठी. ?, दोनवेळची भाकर कमवून, घरदार, मुल बाळांचा सांभाळ करणे ऐवढच का आपल कर्तव्य?, निसर्गाने आपल्याला जन्म दिला, त्यास आपण काय देत आहोत. ?, जंगले सपाट करणे, वृक्षतोडीस पुढाकारांने, निसर्गाचा विनाश करणे, हेच ना आपण आपल्या जन्माची परतफेड करतोय, अरे माणवा, प्रेम, दया, उपकार हे मानवी जिवनाचे लक्षणे आहेत, यात आपण आपले लक्षणे साबुत ठेवली पाहीजे.

प्रेम, दया, वात्सल्य, परोपकार यासारखे माणूसकीचे आलंकार माणवांच्या दैनंदिन जिवनातून कधिच लुप्त झाले आहेत, आज आपण पाहतोय, सकाळी उठल्या पासून ते रात्री झोपे पर्यंत या मानवाला काही ना काही कार्य सतत हाताळले जातात. आणी दिवसेंदिवस हा माणव केवळ पैश्यांच्या गठ्यांकडे वाटचाल करत आसतो. त्यात काहिच वा कुठलाच नाते वा जवळीकता यासारख्या गोष्टींना किंमत देत नाही, मि व माझ संसार हि दुनीया आजच्या माणवांचे स्वप्न, ना कधी विचार समाजाचा, ना देशाचा, मी आनंदी आहे ना बस, बाकीच काही घेण देण नाही, हीच ति मनोवृत्ती.

मानवा, माणूसकी साबूत ठेवा, तरच आपल भाग्य उजळेल, कर्म करणे, श्रम घेणे, यातच तर इश्वरांच दर्शन घडते, श्रमदान, धनदान, शरिरदान करणे म्हणजेच आपले आस्तित्वाची, मानवि जिवनाची परतफेड होय. मित्रांनो शेवटी कोणी कोणाच नसतं म्हणण्यापेक्षा सर्व जग हे आपलच असत म्हणने शिका. कारण सुरवात स्वतः पासून झाली पाहीजे, तरच जग आपल होत. हे मानवा, जे कारायच ते आत्ताच कर, तुला नाव कमवायच का पैसा, हे तुच ठरव, कारण शेवटी जातांनी तुला एकट्यालाच जावे लागेल. ना तिथे तुम्हचा पैसा येतो, ना आस्ति… !

म्हणून माणुसकी शाबूत ठेवत चला. इतरांशी सुसंगतीने वागा, इतरांना मदतीचा हात समोर करा. सुजलाम सुफलाम जीवन जगा. हा मानवी जन्म पुन्हा येणे नव्हे. त्यामुळे आत्ताच आपली ओळख

जगाला दाखवा. एक दिवस तुम्ही आम्ही या जगात नससालही, मात्र तुमच्या अस्मितेचा पोशिंदा ते कायम इथे राहून जाईल.

उसवलेल्या धाग्यांना पुन्हा

नव्यावे विनवत नेऊ....

माणुसकीच्या नात्यांमधला

गोडवा असाच ठेवू....

जाती-धर्माच्या भिंती

ओलांडून सदैव संगती राहू,

मानवतेच्या इमारती उभ्या

आयुष्याला देऊ..

एकमेकांना साहाय्य करुनी

बांधिलकी जपून ठेवू,

आपुलकी अन प्रेम वाटूनी

सुख समृद्धी नांदत नेऊ...

लेखक
**श्रीपाद नागनाथ राऊतवाड**
मदनूर ,तेलंगणा



महात्मा गौतम बुद्धांनी या दुःखाच्या कसोटीवर आपल्या धम्माची स्थापना केली,दुःखी जीवनाला धम्माचा मार्ग दिला.अहिंसा व शांतीचा संदेश देत दुःखी मानवांना सुखी जीवनाच्या प्रवासाची वाट दाखवली. अगदी तसेच पुढे अनेक साधुसंत महापुरुष होऊन गेले,त्यांनीही आपापल्या परीने मानवता धर्माचा प्रचार,प्रसार केला.माणुसकीचे धडे दिले. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव,संत कबीर,संत तुकाराम महाराज,संत गाडगेबाबा , संत तुकडोजी महाराज इ.साधुसंतानी मानवता हाच खरा धर्म,आणि स्त्री आणि पुरुष या दोनच जाती असल्याचे अभंगातून,कीर्तनातून स्पष्टीकरण दिले. मात्र कालांतराने ही शिकवण आजही लोपपावली, इथे धर्माच्या भिंती उभारल्या,जाती-जातीच्या मोठे दरी निर्माण झाल्या,आणि आपापसांत धार्मिक तेढ निर्माण होऊ लागल्या. धर्मातधर्मात रंगाची वाटणी झाली.जाति-जातीत महापुरुषांची वाटणी झाली. माणुसकीचा,मानवतेचा धर्म सांगणाऱ्या साधुसंत महापुरुष हे अत्ता धर्माच्या भिंतीवर उभारले. यांच्या विचारांची जागर कमकुवत चालली.म्हणून या मानवी प्राण्याला याचा रोग ग्रासले आहे,त्या रोगाला प्रबोधनाच्या औषधीचे गरज भासत आहे. आणि ते प्रबोधन या संधुसंताच्या,महापुरुषांच्या विचारातून मिळते.